Vishweshwar, 29/04/2025

# अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर आंबा खरेदीस ग्राहकांची पणन मंडळाच्या आंबा महोत्सवास पसंती

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दि.१ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत मार्केटयार्ड तसेच गांधी भवन–कोथरूड, मगरपट्टा–हडपसर आणि खराडी या चार ठिकाणी 'आंबा महोत्सव २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (Geographical Indication-GI) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. त्यामुळे कोकणच्या हापूसचं नाव बदनाम होत आहे. पण आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन, कृषि पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. या महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल तसेच गांधी भवन–कोथरूड, मगरपट्टा–हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्सद्वारे आंब्याची विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे शहराच्या विविध भागातील ग्राहकांची सोय झाली आहे.

जीआय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. महोत्सवामध्ये १५० उत्पादकांना १२० स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे. महोत्सवामध्ये साधारण १७५ ते ३०० ग्रॅम वजनाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून रू.४०० ते ८०० प्रति डझन दर आहे. दि.१ एप्रिलपासून सुरू झालेल्या महोत्सवात आजअखेर ४५,००० डझन आंब्याची विक्री झाली असुन सुमारे ४ कोटीची उलाढाल झाल्याचे कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री.संजय कदम यांनी सांगितले आहे.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2025-04-29 | Page- 3
epaper.mahamtb.con

थोडक्यात

## 'पणन मंडळा'च्या महोत्सवात आंबा खरेदीस पसंती

**पुणे** : 'महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा'मार्फत दि. १ एप्रिल ते दि. ३१ मे या कालावधीत मार्केटयार्ड तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या चार ठिकाणी 'आंबा महोत्सव २०२५'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यांतील भौगोलिक मानांकन मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे. आता 'जीआय' मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. या महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल्स तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्सद्वारे आंब्याची विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. महोत्सवात आजअखेर ४५ हजार डझन आंब्यांची विक्री झाली असून सुमारे चार कोटींची उलाढाल झाल्याचे 'कृषी पणन मंडळा'चे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले.

Powered by Bharati Web

Navin Sandya, 29/04/2025

# अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर आंबा खरेदीस ग्राहकांची पणन मंडळाच्या आंबा महोत्सवास पसंती

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दि.१ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत मार्केटयार्ड तसेच गांधी भवन–कोथरूड, मगरपट्टा–हडपसर आणि खराडी या चार ठिकाणी 'आंबा महोत्सव २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (Geographical Indication-GI) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. त्यामुळे कोकणच्या हापूसचं नाव बदनाम होत आहे. पण आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन, कृषि पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. या महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल तसेच गांधी भवन–कोथरूड, मगरपट्टा–हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्सद्वारे आंब्याची विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे शहराच्या विविध भागातील ग्राहकांची सोय झाली आहे.

जीआय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. महोत्सवामध्ये १५० उत्पादकांना १२० स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे. महोत्सवामध्ये साधारण १७५ ते ३०० ग्रॅम वजानाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून रू.४०० ते ८०० प्रति डझन दर आहे. दि.१ एप्रिलपासून सुरू झालेल्या महोत्सवात आजअखेर ४५,००० डझन आंब्याची विक्री झाली असुन सुमारे ४ कोटीची उलाढाल झाल्याचे कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री.संजय कदम यांनी सांगितले आहे.

पुण्य नगरी

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात ४ कोटींची उलाढाल

■ पुणे : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत मार्केटयार्ड तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या चार ठिकाणी 'आंबा महोत्सव २०२५' आयोजित करण्यात आला आहे. हा आंबा महोत्सव ३१ मे २०२५ पर्यंत सुरू राहणार असून आतापर्यंत ४५ हजार डझन आंब्याची विक्री झाली असून सुमारे ४ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचे कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम कळविले आहे.

या महोत्सवामध्ये कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. पण आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे.

आंबा महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्स १५० उत्पादकांना आंबा विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जीआय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे. महोत्सवामध्ये साधारणतः १७५ ते ३०० ग्रॅम वजनाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून ४०० ते ८०० रुपये प्रति डझन दर आहे, अशी माहिती देखील कदम यांनी दिली.

पणन मंडळाच्या देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे व्यवस्थापक सुहास काळे म्हणाले की, आत्तापर्यंत चार कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. ३१ मेपर्यंत १० कोटी रुपयांची उलाढाल होईल असा अंदाज आहे.

Pune Edition
Apr 29, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

Lokmanya Sanjwarta, 29/04/2025

# अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांची पणन मंडळाच्या आंबा महोत्सवास पसंती



**पुणे (दैनिक लोकमान्य सांजवार्ता प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दि.१ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत मार्केटयार्ड तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या चार ठिकाणी 'आंबा महोत्सव २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. त्यामुळे कोकणच्या हापूसचं नाव बदनाम होत आहे. पण आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन, कृषि पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतक-यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. या महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्सद्वारे आंब्याची विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे शहराच्या विविध भागातील ग्राहकांची सोय झाली आहे. जीआय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. महोत्सवामध्ये १५० उत्पादकांना १२० स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे.

महोत्सवामध्ये साधारण १७५ ते ३०० ग्रॅम वजानाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून रू.४०० ते ८०० प्रति डझन दर आहे. दि.१ एप्रिलपासून सुरू झालेल्या महोत्सवात आजअखेर ४५,००० डझन आंब्याची विक्री झाली असुन सुमारे ४ कोटीची उलाढाल झाल्याचे कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले आहे.

Kesari, 29/04/2025

# पुण्यातील आंबा महोत्सवाला प्रतिसाद

## आतापर्यंत ४५ हजार डझन आंब्यांची विक्री

**पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत मार्केटयार्ड, गांधीभवन (कोथरूड), मगरपट्टा (हडपसर) आणि खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सव २०२५ आयोजित करण्यात आला आहे. हा आंबा महोत्सव ३१ मे २०२५ पर्यंत सुरू राहणार असून, आतापर्यंत ४५ हजार डझन आंब्यांची विक्री झाली असून, सुमारे ४ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याने कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी कळविले आहे.



या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधूदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या पाच जिल्ह्यांतील भौगोलिक मानांकन (जीआय) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे. कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते; पण आता जी आय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन या महोत्सवात देखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आंबा महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल, तसेच गांधीभवन, मगरपट्टा, खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्स, १५० उत्पादकांना आंबा विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जी आय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. त्यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे.

महोत्सवामध्ये साधारणतः १७५ ते ३०० ग्रॅम वजनाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून, ४०० ते ८०० रुपये प्रति डझन दर आहेत, अशी माहिती देखील कदम यांनी दिली.

Divas Ratri, 29/04/2025

# उपभोक्ता अक्षय तृतीया के अवसर पर आम खरीदने के लिए विपणन बोर्ड के आम महोत्सव को प्राथमिकता देते हैं




**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड के माध्यम से १ अप्रैल से ३१ मई २०२५ तक मार्केट यार्ड के साथ-साथ 'मैंगो फेस्टिवल २०२५' चार स्थानों पर आयोजित किया जाएगा - गांधी भवन-कोथरुड, मगरपट्टा-हडपसर और खराडी यह हो गया है। यह महोत्सव कोंकण के पांच शहरों रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगढ़, पालघर और थाने में आयोजित किया गया।

हापुस आम, जिसे जिले में भौगोलिक संकेत (जीआई) प्राप्त है, साथ ही राज्य में केशर, पायरी और अन्य किस्मों के आम उपलब्ध हैं।

अन्य राज्यों से आयातित आम कोंकण में हापुस के नाम से व्यापक रूप से बेचे जाते हैं। इसलिए कोंकण के हापुस का नाम खराब किया जा रहा है। लेकिन अब जीआई रेटिंग के कारण हापुस का नाम बदला जा रहा है।

धोखाधड़ी से बचा जा सकेगा। इस बात को ध्यान में रखते हुए कृषि विपणन बोर्ड द्वारा आयोजित आम बाजार यह निर्णय लिया गया कि महोत्सव में जीआई दर्जा प्राप्त किसानों को भी शामिल किया जाएगा। इस महोत्सव में मार्केट यार्ड में ६० स्टॉल लगाए जाएंगे, साथ ही गांधी भवन-कोथरुड, मगरपट्टा-हडपसर और खराडी में भी स्टॉल लगाए गये।

इस स्थान पर कुल १२० स्टॉलों के माध्यम से २०-२० आम बेचे गए। इसके कारण शहर के विभिन्न भागों से आये ग्राहकों को सुविधा प्रदान की गयी है। उपभोक्ताओं को जीआई और यूआईडी टैग वाले आम बेचे जा रहे हैं। इससे किसान उत्पादक बनते हैं अच्छी कीमत मिल रही है. महोत्सव में १५० उत्पादकों के लिए १२० स्टॉल उपलब्ध कराए गए हैं। इस में इसमें हापुस, केशर, प्यारी और बिटकी (छोटा) आम शामिल हैं। इस महोत्सव में लगभग १७५ से ३०० लोग शामिल होते हैं।

१०० ग्राम वजन वाले आम १०० रुपये प्रति किलो के भाव पर बिक रहे हैं। ४०० से ८०० प्रति दर्जन। १ अप्रैल से आज के अंत तक महोत्सव में ४५,००० दर्जन आम बिक चुके हैं, जिससे लगभग ४ करोड़ रुपये का कारोबार हुआ है।

यह बात कृषि विपणन बोर्ड के कार्यकारी निदेशक श्री संजय कदम ने कही है।

Agrowon, 28/04/2025

# देवगड हापूसला मिळाली थेट अमरावती बाजारपेठ

अॅग्रोवन वृत्तसेवा

अमरावती : देवगड (जि. सिंधुदुर्ग) येथील शेतकऱ्याला थेट अमरावती बाजारपेठेत हापूस विक्रीची परवानगी देत शेतकरी ते ग्राहक उपक्रमाला बळ देण्याचा प्रयत्न अमरावती बाजार समितीकडून करण्यात आला. याला ग्राहकांचा देखील चांगला प्रतिसाद मिळाल्याने पुढील वर्षीपासून आंबा महोत्सव घेण्याचा मनोदय बाजार समिती सचिव दीपक विजयकर यांनी व्यक्त केला.

अमरावती बाजार समितीचे सचिव दीपक विजयकर हे गुलटेकडी (पुणे) स्थित कृषी पणन मंडळाच्या कार्यालयात काही कामानिमित्त गेले होते. या वेळी पणन मंडळाच्या खालील बाजूस आंबा महोत्सव सुरू असल्याने त्यांनी आंबा महोत्सवातील प्रत्येक स्टॉलवर जात माहिती घेतली. राज्याच्या विविध भागातील आंब्याची उपलब्धता या ठिकाणी करण्यात आली होती. या आंबा फळांना ग्राहकांची देखील चांगली मागणी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या दरम्यान देवगड येथील संकेत पुजारी या युवा शेतकऱ्याशी दीपक विजयकर यांनी संवाद साधला. संवादादरम्यान संकेत पुजारी यांनी हापूस विक्रीसाठी अमरावती बाजार समितीच्या परिसरात जागा उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

> युवा शेतकऱ्याने देवगड हापूस विक्रीसाठी जागा उपलब्धतेची मागणी केली होती. त्यानुसार स्टॉलकरिता जागा देण्यात आली. या उपक्रमाला ग्राहकांचा प्रतिसाद मिळाल्याने पुढील वर्षी आंबा महोत्सव उपक्रम राबविण्याबाबत सकारात्मकता आहे.
>
> **- दीपक विजयकर,** सचिव, बाजार समिती, अमरावती

युवा शेतकऱ्याच्या या हाकेला श्री. विजयकर यांनी तत्काळ प्रतिसाद देत त्यास अमरावती बाजार समितीच्या परिसरात स्टॉल लावण्यास सांगितले. त्यानुसार संकेत पुजारी यांनी देखील पुण्यातील आंबा महोत्सव संपताच अमरावती गाठले. बाजार समितीच्या प्रवेशद्वारावरच त्यांनी देवगड हापूस विक्रीचा स्टॉल लावला. याला ग्राहकांचा देखील चांगला प्रतिसाद मिळाल्याचे संकेत यांनी सांगितले.

सामना

# अहिल्यानगरच्या डाळिंबाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोहोर

**अहिल्यानगर : भारतीय डाळिंब आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये पोहचविण्याच्या ऐतिहासिक उपक्रमांतर्गत अहिल्यानगरमधील भगवा जातीचे १४ टन डाळिंब समुद्रमार्गे अमेरिकेच्या न्यूयॉर्कमध्ये पोहचले आहेत. अहिल्यानगरच्या भगव्या डाळिंबाने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपली मोहोर उमटविली आहे. ताज्या फळांच्या निर्यातीचा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.**

## अमेरिकेला १४ टन डाळिंबांची निर्यात



सन २०२३ मध्ये अमेरिकेने भारताला डाळिंब निर्यातीसाठी बाजार प्रवेश दिल्यानंतर कृषी व प्रक्रिया केलेले अन्न, उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाने अमेरिकन कृषी विभागाचे प्राणी व वनस्पती आरोग्य तपासणी सेवा आणि सोलापूर येथील राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र यांच्या सहकार्याने डाळिंबाची हवाई मार्गे यशस्वी चाचणी पाठवणी केली होती.

कृषी व प्रक्रिया केलेले अन्न, उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण आणि राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र यांच्या सहकार्याने डाळिंबाचे शेल्फ लाईफ ६० दिवसांपर्यंत वाढविण्यासाठी स्थिर चाचणी यशस्वी केल्यानंतर भारताने सन २०२४ च्या फेब्रुवारी महिन्यात नवी मुंबईतील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ येथील किरणोत्सर्ग सुविधा केंद्रातून ४ हजार २०० बॉक्स म्हणजेच १२.६ टन डाळिंब समुद्रमार्गे यशस्वी प्रायोगिक पाठवणी करण्यात आली होती.



कृषी व प्रक्रिया केलेले अन्न, उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाने डिसेंबर २०२४ मध्ये प्री-क्लिअरन्स कार्यक्रमास प्रोत्साहन दिल्यामुळे भारतीय कृषी निर्यातदारांसाठी लॉजिस्टिक्स आणि नियामक अडथळे दूर होण्यास मदत झाली.

### अमेरिकन ग्राहक समाधानी

भगवा डाळिंब त्याच्या गडद लाल रंगासाठी, समृद्ध स्वादासाठी व उच्च पोषण मूल्यांसाठी प्रसिद्ध आहे. अँण्टिऑक्सिडंट्स व महत्त्वपूर्ण तत्त्वांनी परिपूर्ण आहे. डाळिंबाच्या समुद्रमार्गे यशस्वी पाठवणीनंतर १४ टन वजनाचे ४ हजार ६२० डाळिंबाचे बॉक्स अमेरिकेच्या ईस्ट कोस्टवर मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात पोहोचले. निर्यातीच्या पाच आठवड्यांत माल पोहोचल्याने त्याची गुणवत्ता उत्कृष्ट असल्याचे नोंदविले गेले आणि न्यूयॉर्कमधील ग्राहकांनी त्यांच्या अप्रतिम देखाव्याने व स्वादिष्ट चवीचे समाधान व्यक्त केले.

### थेट शेतकऱ्यांना लाभ

डाळिंबाची ही निर्यात मुंबईस्थित के. बे. एक्स्पोर्ट्स या आघाडीच्या फळ व भाजीपाला निर्यातदार संस्थेद्वारे करण्यात आली आहे. ही संस्था कृषी व प्रक्रिया केलेले अन्न, उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाकडे नोंदणीकृत आहे. या निर्यातीमधील डाळिंब थेट के.बे. एक्स्पोर्ट्सच्या शेतांमधून संकलित करण्यात आले होते. त्यामुळे त्याचा लाभ थेट शेतकरी बांधवांपर्यंत पोहचला.

“ अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ही बाब गौरवास्पद आहे. कृषी व प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात प्राधिकरणाच्या माध्यमातून अहिल्यानगर येथून प्रथमच १४ टन भगवा डाळिंब अमेरिकेस यशस्वीरीत्या निर्यात झाले. हे शेतकऱ्यांच्या मेहनतीचे फळ असून भारतीय फळांच्या दर्जाचा जागतिक स्तरावर स्वीकार झाल्याचे ते उदाहरण आहे. भारत सरकारच्या प्रयत्नामुळे तसेच विविध संस्था, शेतकरी, निर्यातदार यांच्या एकत्रित सहकार्यातून हे शक्य झाले आहे. ही बाब केवळ अहिल्यानगर जिल्ह्यासाठी नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी अभिमानाची आहे.

**नीलेश लंके**, खासदार

“ कृषी व प्रक्रिया केलेले अन्न, उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाने भारतीय डाळिंबाची निर्यात अमेरिकेला सुलभ केली आहे. बाजारपेठेत प्रवेश मिळवून देणे, निर्यात प्रोटोकॉल सेट करणे या सर्व बाबतीत कृषी व प्रक्रिया केलेले अन्न, उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाने मोलाची भूमिका बजावली आहे. आम्ही दर्जेदार डाळिंब देण्यासाठी कटिबद्ध आहोत. भविष्यातही तसेच प्रयत्न करणार आहोत.

– **कौशल खाखर**, मुख्य कार्यकारी अधिकारी के.बे.एक्स्पपोर्ट्स

“ भारत सरकार भारतीय ताज्या फळांच्या जागतिक बाजापेठेसाठी सतत प्रोत्साहन देत आहे. कृषी व प्रक्रिया केलेले अन्न, उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाने आंबा व डाळिंब यांच्या निर्यातीसाठी प्री-क्लिअरन्स कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. भारतीय शेतकऱ्यांना प्रीमियम आंतरराष्ट्रीय बाजारातून चांगला दर मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. भारतीय आंब्याची वार्षिक निर्यात सुमारे ३ हजार ५०० टन इतकी झाली आहे. भविष्यात डाळिंबही त्याच पद्धतीने मोठ्या प्रमाणार निर्यात होईल, अशी अपेक्षा आहे.

– **अभिषेक देव**, अध्यक्ष, कृषी व प्रक्रिया केलेले अन्न, उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण

Sakal, 28/04/2025

# देवगड हापूसला मिळाली थेट अमरावती बाजारपेठ

अॅग्रोवन वृत्तसेवा

अमरावती : देवगड (जि. सिंधुदुर्ग) येथील शेतकऱ्याला थेट अमरावती बाजारपेठेत हापूस विक्रीची परवानगी देत शेतकरी ते ग्राहक उपक्रमाला बळ देण्याचा प्रयत्न अमरावती बाजार समितीकडून करण्यात आला. याला ग्राहकांचा देखील चांगला प्रतिसाद मिळाल्याने पुढील वर्षीपासून आंबा महोत्सव घेण्याचा मनोदय बाजार समिती सचिव दीपक विजयकर यांनी व्यक्त केला.

अमरावती बाजार समितीचे सचिव दीपक विजयकर हे गुलटेकडी (पुणे) स्थित कृषी पणन मंडळाच्या कार्यालयात काही कामानिमित्त गेले होते. या वेळी पणन मंडळाच्या खालील बाजूस आंबा महोत्सव सुरू असल्याने त्यांनी आंबा महोत्सवातील प्रत्येक स्टॉलवर जात माहिती घेतली. राज्याच्या विविध भागातील आंब्याची उपलब्धता या ठिकाणी करण्यात आली होती. या आंबा फळांना ग्राहकांची देखील चांगली मागणी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या दरम्यान देवगड येथील संकेत पुजारी या युवा शेतकऱ्याशी दीपक विजयकर यांनी संवाद साधला. संवादादरम्यान संकेत पुजारी यांनी हापूस विक्रीसाठी अमरावती बाजार समितीच्या परिसरात जागा उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

> “
> युवा शेतकऱ्याने देवगड हापूस विक्रीसाठी जागा उपलब्धतेची मागणी केली होती. त्यानुसार स्टॉलकरिता जागा देण्यात आली. या उपक्रमाला ग्राहकांचा प्रतिसाद मिळाल्याने पुढील वर्षी आंबा महोत्सव उपक्रम राबविण्याबाबत सकारात्मकता आहे.
>
> **- दीपक विजयकर,** सचिव, बाजार समिती, अमरावती

युवा शेतकऱ्याच्या या हाकेला श्री. विजयकर यांनी तत्काळ प्रतिसाद देत त्यास अमरावती बाजार समितीच्या परिसरात स्टॉल लावण्यास सांगितले. त्यानुसार संकेत पुजारी यांनी देखील पुण्यातील आंबा महोत्सव संपताच अमरावती गाठले. बाजार समितीच्या प्रवेशद्वारावरच त्यांनी देवगड हापूस विक्रीचा स्टॉल लावला. याला ग्राहकांचा देखील चांगला प्रतिसाद मिळाल्याचे संकेत यांनी सांगितले.

Agrowon, 28/04/2025

# ‘सुंदरबन’च्या माध्यमातून शेतमालाचा कंटेनर अमेरिकेला

न्हावरे, दि. २७ (सा. वा.) - न्हावरे (ता. शिरूर) येथील सुंदरबन फ्रूट्स अ‍ॅण्ड व्हेजिटेबल प्रोसेसिंग क्लस्टरच्या माध्यमातून शिरूर-हवेलीतील शेतकऱ्यांनी शेतमालाचे निर्जलीकरण केले आहे. निर्जलीकरण (डिहायड्रेशन) प्रक्रियेद्वारे मूल्यवर्धन करून फ्लेक्स आणि पावडर स्वरूपातील तयार उत्पादनांचा पहिला कंटेनर अमेरिकेला रवाना करण्यात आला. सुंदरबन फूड क्लस्टरअंतर्गत शेतकऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.



पुरेशा बाजारभावाअभावी शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने शेतमाल विकावा लागतो. त्यामुळे न्हावरे (ता. शिरूर) येथील ग्रामीण तंत्रज्ञान संस्थेने पुढाकार घेत खादी आणि ग्रामोद्योगच्या माध्यमातून सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाअंतर्गत शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन करण्यासाठी तसेच त्याद्वारे त्यांना रोजगारही निर्माण व्हावा यासाठी शिरूर-हवेलीतील ४०५ शेतकऱ्यांना एकत्रित करून सुंदरबन फ्रूटस अ‍ॅण्ड व्हेजिटेबल प्रोसेसिंग क्लस्टरची स्थापना केली. यात शेतकऱ्यांचा शेतमाल निर्जलीकरण (डिहायड्रेशन) प्रक्रियेद्वारे सुकवून त्याचे फ्लेक्स तसेच पावडर तयार करण्यात येते. या प्रकियेमुळे या शेतमालाचे मूल्यवर्धन होते. साठवण कालावधीही वाढतो.

सुंदरबनमध्ये अंतिम निर्जलीकरण प्रकियेनंतर पुढे फ्लेक्स व पावडर स्वरूपात तयार केलेला हा माल आकर्षक पॅकिंग करून आनंदघना इंडस्ट्रीजच्या माध्यमातून बाजारात विकला जातो. आजवर देशांतर्गत बाजारपेठेत विकली जाणारी सुंदरबन प्रकल्पातील ही उत्पादने यावर्षी प्रथमच शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या एकूण १२ उत्पादनांसह आकर्षक पॅकिंगमध्ये अमेरिकेच्या विविध मॉलमध्ये विक्रीसाठी पाठविली आहेत. यामध्ये शेवगा (मोरिंगा) पावडर, बीट पावडर, भोपळा पावडर, लिंबू, गाजर, मूग, पालक व कांदा यासह एकूण १२ उत्पादने २०० ग्रॅमच्या व ५० ग्रॅमच्या पॅकिंग करून पाठवली आहेत. क्लस्टरच्या या यशाबद्दल खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे राज्य संचालक योगेश भामरे, तांत्रिक मार्गदर्शक राजेंद्र शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे. या उपक्रमामुळे सभासद शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असल्याचे ग्रामीण तंत्रज्ञान संस्थेचे अध्यक्ष डॉ. अरविंद शाळीग्राम यांनी सांगितले.

> “ अमेरिकेमधील अनुभवानंतर लवकरच आम्ही युरोपीय देशामध्येही निर्जलीकरण (डिहायड्रेशन) प्रक्रिया केलेला शेतमाल पाठवण्यासाठी प्रयत्नशील आहोत. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणक्षमता वाढ, तसेच रोजगार निर्मितीचाही उद्देश साध्य होत आहे.
>
> **- गीताराम कदम, अध्यक्ष, सुंदरबन फ्रूट्स अ‍ॅण्ड व्हेजिटेबल प्रोसेसिंग क्लस्टर**

> “ बाजारात कवडीमोल दराने विकावा लागणारा अथवा प्रसंगी फेकूनही द्यावा लागणाऱ्या शेतमालाचे सुंदरबन फ्रूट्स अ‍ॅण्ड व्हेजिटेबल प्रोसेसिंग क्लस्टरमुळे मूल्य वाढत आहे. रोजगार निर्मितीही होत आहे. अमेरिकेसारख्या देशात आमचा निर्जलीकरण प्रक्रिया केलेला शेतमाल जातो, याचा आनंद आहे.
>
> **- अरविंद शिंदे, शेतमाल उत्पादक शेतकरी, करंजावणे.**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# आंबा महोत्सव 2025

Marketing Initiative

# जागतिक बाजारावर भारतीय आंब्यांची चमक

**निर्यातीच्या संपूर्ण साखळीत अत्याधुनिक प्रक्रिया, बागांची नोंदणी, परवाने, प्रमाणपत्रे आणि दर्जानियंत्रित यंत्रणा कार्यरत असून, त्यामुळे महाराष्ट्रातील आंब्यांचा गोडवा सातासमुद्रापार पोहचत असून, या बाजारपेठेला यापुढे उज्ज्वल भविष्य राहणार आहे. ज्यामुळे जागतिक बाजारावर भारतीय आंब्यांची चमक वाढतच राहील, यावर टाकलेला ऊहापोह. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने देशांतर्गत बाजारात विक्रीसाठी आंबा महोत्सवास प्राधान्यक्रम दिलेला आहे. त्याचबरोबर आंबा निर्यातीसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा राज्यात उभारल्या आहेत. या सुविधांचा लाभ घेऊन राज्यातील शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे दर मिळत आहेत.**





भारत देशातून दरवर्षी सुमारे ६०-७० देशांना आंब्याची निर्यात केली जाते. त्यापैकी सुमारे ८० ते ८५ टक्के आंबा हा महाराष्ट्रातून निर्यात केला जातो. राज्यातील कोकण विभागातील हापूस, मराठवाड्यामधील केशर व राज्यातून इतर भागांमधील देखील आंब्याची निर्यात केली जाते. विविध विकसित देशांच्या मागणीनुसार निर्यातीपूर्वी देशनिहाय आंब्यावर काही विशेष प्रक्रिया कराव्या लागतात. त्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व सुविधा कृषी पणन मंडळाने राज्यामध्ये उभारल्या आहेत. त्या सुविधांच्या वापरातून शेतकरी, निर्यातदार आंब्याची विकसित देशांना निर्यात करीत आहेत. आंबा हंगाम-२०२५ एप्रिल **महिन्यापासून सुरू** झाला आहे. महाराष्ट्र **राज्य कृषी** पणन मंडळामार्फत **या** हंगामासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. हापूस, केशर व इतर वाणांच्या दर्जेदार आंब्याच्या निर्यातीसाठी आवश्यक असलेल्या **प्रक्रिया** सुविधा - पॅक **हाऊस**, उष्णजल प्रक्रिया, **उष्णबाष्प** प्रक्रिया, विकिरण प्रक्रिया आदींची उभारणी व अद्ययावतीकरण पणन मंडळामार्फत करण्यात आले आहे. या सुविधा वापरून दरवर्षी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, मलेशिया, कॅनडा, आखाती देश, रशिया इत्यादी देशांमध्ये आंबा निर्यात केला जातो. नवी मुंबईतील वाशी येथील आंबा निर्यात सुविधा केंद्रात सर्व आधुनिक सुविधा उभारण्यात आल्या असून, या केंद्रामार्फत व्हेपर हीट ट्रीटमेंट, हॉट वॉटर ट्रीटमेंट व विकिरण प्रक्रिया सुविधा पुरविल्या जातात. येथे दरवर्षी सुमारे २०००-२५०० मेट्रिक टन आंब्यावर आयातदार देशांना आवश्यक असलेल्या विविध प्रक्रिया निर्यातीपूर्वी केल्या जातात. याशिवाय नाचणे (रत्नागिरी), जामसंडे (सिंधुदुर्ग) व बारामती (पुणे) येथील निर्यात सुविधा केंद्रांतूनही प्रक्रिया व निर्यात यशस्वीरीत्या केली जात आहे.

अमेरिकेमध्ये निर्यात करण्यासाठी यू. एस. डी. ए.मार्फत नेमलेले निरीक्षक एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात वाशी येथे दाखल होतात. त्यांच्या उपस्थितीतच निर्यातीपूर्वी आवश्यक प्रक्रिया व तपासणी केली जाते. ही सुविधा अमेरिकेच्या फळमाशीविषयक निकषांची पूर्तता करीत असल्याने निर्यात अधिक सुरक्षितपणे व निकोप वातावरणात होत आहे व परदेशात भारतीय आंब्यांचा नावलौकिक वाढण्यासही मदत होत आहे. यंदाच्या आंबा हंगाम-२०२५ मध्ये समुद्रमार्गे आंबा निर्यात व्यावसायिक दृष्ट्या वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. गेल्या वर्षी यशस्वी प्रायोगिक निर्यातीच्या अनुभवातून या वर्षी समुद्रमार्गे निर्यातीचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी गरजेनुसार प्रक्रियाक्षमतेत वाढ केली जात आहे. वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रातून यंदा अमेरिकेत १३०० मे. टन, ऑस्ट्रेलियास ७५ मे. टन आणि मलेशिया येथे निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या अपेडा संस्थेमार्फत विकसित करण्यात आलेल्या मँगोनेट प्रणालीवर देशभरातील निर्यातक्षम आंबाबागांची नोंदणी केली जाते.

**- संजय कदम, कार्यकारी संचालक,**
**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ**

## २४ दिवसांत ११५८ मे. टन आंबा निर्यात

यंदा १ एप्रिल २०२५ पासून आंबा निर्यात हंगाम सुरू झाला आहे. तर, अवघ्या २४ दिवसांत ११५८ मे. टन आंबा निर्यात करण्यात पणन मंडळाच्या सुविधांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये हापूस व केशर आंब्यांचा समावेश असून, ही निर्यात प्रामुख्याने अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड व युरोपियन देशांना करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत निर्यातदारांकडून शेतकऱ्यांना हापूस आंब्याला प्रतिकिलो रु. १५० ते ३०० आणि केशर आंब्याला रु. १५० ते २५० दर मिळत आहे. आंब्याची गुणवत्ता, आकारमान व उपलब्धतेनुसार दर ठरविले जातात.






Punyanagari, 25/04/2025

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात ४ कोटींची उलाढाल

। पुणे : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत मार्केटयार्ड तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या चार ठिकाणी 'आंबा महोत्सव २०२५' आयोजित करण्यात आला आहे. हा आंबा महोत्सव ३१ मे २०२५ पर्यंत सुरू राहणार असून आतापर्यंत ४५ हजार डझन आंब्याची विक्री झाली असून सुमारे ४ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचे कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम कळविले आहे.

या महोत्सवामध्ये कोकणातल्या हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची सर्रास विक्री होते. पण आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे.

आंबा महोत्सवामध्ये मार्केटयार्ड येथे ६० स्टॉल तसेच गांधी भवन-कोथरूड, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी या ठिकाणी प्रत्येकी २० असे एकूण १२० स्टॉल्स १५० उत्पादकांना आंबा विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जीआय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे. महोत्सवामध्ये साधारणतः १७५ ते ३०० ग्रॅम वजनाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून ४०० ते ८०० रुपये प्रति डझन दर आहे, अशी माहिती देखील कदम यांनी दिली.

पणन मंडळाच्या देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे व्यवस्थापक सुहास काळे म्हणाले की, आत्तापर्यंत चार कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. ३१ मेपर्यंत १० कोटी रुपयांची उलाढाल होईल असा अंदाज आहे.

Maharashtra Times, 24/04/2025

# बारामती बाजार समिती तिसऱ्या क्रमांकावर

## वार्षिक क्रमवारी पणन संचालनालयाकडून जाहीर

पुणे : बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यातील ३०५ बाजार समित्यांची आणि ६८ खासगी बाजारांची २०२३-२४ या वर्षीच्या कामगिरीवर आधारित वार्षिक क्रमवारी पणन संचालनालयाकडून जाहीर करण्यात आली आहे. या क्रमवारीनुसार राज्यातील पहिल्या दहा बाजार समित्यांमध्ये पुणे विभागातील बारामती बाजार समितीने तिसरा क्रमांक पटकावला आहे.

वार्षिक क्रमवारीनुसार राज्यात पहिल्या दहा बाजार समित्यांमध्ये वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट बाजार समिती १७८ गुण मिळवून पहिल्या क्रमांकावर, वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड बाजार समिती १७१.५ गुणांसह दुसऱ्या स्थानी, बारामती १६५ गुणांसह तिसऱ्या स्थानी, १५५.५ गुणासह पंढरपूर पाचव्या आणि १४९ गुण मिळवून अकलूज आठव्या स्थानावर आहे. राज्यातील सहकार विभागाच्या रचनेनुसार विभागातील बारामती, पंढरपूर व अकलूज हे अनुक्रमे पहिल्या तीन स्थानावर आहेत. बाजार समित्यांची; तसेच खासगी बाजारांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी पणन संचालनालयाकडून जागतिक बँकेच्या सूचनेनुसार शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधा, आर्थिक व वैधानिक कामकाज, योजना, उपक्रम राबवण्यातील सहभाग यानुसार ३५ निकष तयार करण्यात आले आहेत. बाजार समित्यांच्या निकषासाठी २०० गुण व खासगी बाजारांसाठी २५० गुण निश्चित करण्यात आले ङआहेत.

'या क्रमवारीमुळे शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी बाजार समित्यांमध्ये; तसेच खासगी बाजारांमध्ये अधिकाधिक सुविधा देण्याची निकोप स्पर्धा निर्माण होण्यास चालना मिळाली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी बाजार समित्यांनी अधिक जोमाने काम करावे,' असे आवाहन पणन संचालक विकास रसाळ यांनी केले आहे.

# आंबा निर्यातीत ५० टक्क्यांची घट

## इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धाचा परिणाम; हवाई वाहतुकीवर ताण

दत्ता जाधव, लोकसत्ता

**पुणे :** इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धामुळे समुद्रमार्गे होणारी निर्यात बंद आहे. त्यामुळे हवाई वाहतुकीवर मोठा ताण आला आहे. वाढीव दरानेही आंबा निर्यातीसाठी निर्यातदारांना कोटा मिळत नसल्यामुळे आंबा निर्यात सुमारे ५० टक्क्यांनी घटली आहे.



> इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धामुळे हवाई वाहतूक दरात २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. वाढीव दरानेही निर्यातदार आंबा निर्यातीस तयार आहेत. पण, हवाई वाहतूक कंपन्यांकडून आंब्याला निर्यात कोटा मिळत नाही. यंदा हापूसचे उत्पादन चांगले आहे. निर्यातीला युद्धामुळे मोठा फटका बसत आहे. दोन शेतकरी उत्पादक कंपन्या आंबा निर्यात करीत आहेत. - संजय कदम, व्यवस्थापकीय संचालक, राज्य कृषी पणन मंडळ

### मुंबईतून ६२५ टन आंबा परदेशात

वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रावरून २३ एप्रिलअखेर सुमारे ६२५ टन आंब्याची निर्यात झाली. ब्रिटनला ४००, अमेरिकेला २००, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडला प्रत्येकी १५ आणि जपानला तीन टन आंब्याची निर्यात झाली असून अमेरिकेला २८ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. दक्षिण कोरियाला २८ एप्रिलपासून निर्यात सुरू होणार आहे. निर्यातीत सर्वाधिक ६० टक्क्यांपर्यंत हापूसचा वाटा आहे. त्या खालोखाल केशर, बेगनपल्ली, बदामी आदी जातींच्या आंब्याचा समावेश आहे.

इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धामुळे समुद्रमार्गे होणारी निर्यात बंद आहे. त्यामुळे सर्व प्रकारची निर्यात हवाईमार्गे सुरू आहे. परिणामी हवाई वाहतुकीवर मोठा ताण आला आहे. हवाई वाहतूक दरात सरासरी २५ टक्क्यांनी वाढ झाली. वाढीव दरानेही आंबा निर्यात करण्यासाठी निर्यातदार तयार आहेत. पण हवाई वाहतूक कंपन्यांकडून आंबा निर्यातीसाठी अपेक्षित कोटा मिळत नाही, अशी माहिती पणन मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली.

यंदा राज्यात आंबा उत्पादन चांगले आहे. निर्यातक्षम दर्जाचा हापूस मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. निर्यातीत मोठी वाढ होण्याचा अंदाज होता. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने एकूण पाच हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट ठेवले होते. पण ते गाठणे कठीण दिसत आहे. आतापर्यंत सुमारे १२०० टन आंबा निर्यात होणे अपेक्षित होते. पण यंदा २३ एप्रिलअखेर वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रावरून फक्त ६२५ टन आंब्याची निर्यात झाली आहे. मागील वर्षी हापूसचे उत्पादन कमी असतानाही केवळ अमेरिकेला ८५० टन आंबानिर्यात झाली होती. निर्यात सुविधा आणि आंब्याची उपलब्धता चांगली असतानाही निर्यात घटली आहे. इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धाचा मोठा फटका आंबा निर्यातीला बसत आहे.

वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळांचे व्यापारी संजय पानसरे म्हणाले, की यंदा अमेरिकेतून आंब्याला मोठी मागणी आहे. पण वाहतुकीत अडचणी येत आहेत. नाशवंत शेतमालाच्या निर्यातीला हवाई वाहतूक कंपन्यांकडून प्राधान्य मिळणे अपेक्षित असतानाही बिगरनाशवंत मालाच्या निर्यातीला प्राधान्य दिले जात आहे. राज्यात निर्यातक्षम आंब्याची उपलब्धता चांगली आहे. यामुळे निर्यातीला अधिक वाव आहे.

MAGZTER
Clipped from - Loksatta Pune - April 24, 2024
Read it digitally on the Magzter app

Agrowon, 23/04/2025

महाॲग्रो

# राज्यातील बाजार समित्यांचे 'पणन'कडून मूल्यमापन जाहीर

## हिंगणघाट प्रथम, तर कारंजालाड द्वितीय, बारामती तृतीय

**गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : राज्यातील बाजार समित्यांच्या २०२३-२४ या वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन पणन संचालनालयाद्वारे जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार अनुक्रमे हिंगणघाट, कारंजालाड आणि बारामतीचा प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक आहे. तर खासगीमध्ये कॉटनसिटी (यवतमाळ), किसान मार्केट (पुसद) आणि परफेक्ट (नाशिक) या बाजार समित्यांचा समावेश आहे, अशी माहिती पणन संचालक विकास रसाळ यांनी दिली.

दरम्यान, पहिल्या १० बाजार समित्यांमध्ये पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर, या मोठ्या आणि महत्त्वाच्या बाजार समित्यांना स्थान मिळाले नसल्याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. जागतिक बँकेच्या अर्थसाह्याने बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजावर वार्षिक मूल्यमापन केले जाते. हे मूल्यमापन करताना, बाजार समित्यांमधील विक्री व्यवस्था, पायाभूत सुविधा, आर्थिक नियोजन, शासकीय योजना आणि उपक्रम राबविणे आदी विविध ३५ निकषांवर २०० गुणांचे मूल्यमापन करण्यात आले. तर खासगी बाजार समित्यांसाठी ४० निकष आणि २५० गुणांचे मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यमापनासाठी तालुका, जिल्हा आणि राज्यपातळी असे स्तर ठरविण्यात आले होते. विविध स्तरांवर झालेल्या मूल्यमापनानंतर अंतिम आकडेवारी जाहीर करण्यात आली.



" शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानत हिंगणघाट बाजार समितीची वाटचाल सुरू आहे. बाजारशुल्कातून शेतकरी हिताचे उपक्रम राबविण्याला बाजार समितीने प्राधान्य दिले आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांना एक रुपयात जेवण, मोफत बस सेवा, शेतकऱ्यांच्या उच्चशिक्षित पाल्यांना लॅपटॉप सुविधा दिल्या जातात. तसेच माती परीक्षण व त्या आधारे आणि बाजारपेठेतील मागणी पुरवठ्यानुसार हंगामनिहाय पीक सल्ला, सेवा देखील देण्याचा बाजार समितीचा मानस आहे. याबरोबरच कोल्ड स्टोरेजची उभारणी देखील प्रस्तावित आहे. शेतीमालाला जास्त भाव कसा मिळेल यावर देखील बाजार समिती लक्ष ठेवून असते त्याकरिता सातत्याने लिलाव प्रक्रियेत बदल केला जातो. शेतकरी हिताच्या उपक्रमाचेच हे फलित आहे की आमची बाजार समिती राज्यात अव्वल आली आहे.

**- ॲड. सुधीर कोठारी, सभापती, बाजार समिती, हिंगणघाट, वर्धा**

**प्रथम १२ बाजार समित्या आणि मिळालेले गुण**

| बाजार समिती | जिल्हा | गुण |
|---|---|---|
| हिंगणघाट | वर्धा | १७८ |
| कारंजा लाड | वाशीम | १७१.५ |
| बारामती | पुणे | १६५ |
| लासलगाव | नाशिक | १६५ |
| पंढरपूर | सोलापूर | १५५.५ |
| चांदूर बाजार | अमरावती | १५५.५ |
| अकोला | अकोला | १५४.५ |
| उमरेड | नागपूर | १५२.५ |
| अकलूज | सोलापूर | १४९ |
| मंगळूरपीर | वाशीम | १४९ |
| लातूर | लातूर | १४८.५ |
| संगमनेर | अहिल्यानगर | १४८ |

**खासगी बाजार समित्या**

| | |
|---|---|
| कॉटनसिटी (भोयर, जि. यवतमाळ) | १७५.५ |
| किसान मार्केट (शेलू, यवतमाळ) | १५४.५ |
| परफेक्ट कृषी (नांदूर, नाशिक) | १४६.५ |
| रंगराव पाटील (उदगीर, लातूर) | १४२.५ |
| श्री गजानन (पळसगाव, जि. हिंगोली) | १४१.५ |

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे रँकिंग जाहीर

**हिंगणघाट बाजार समिती प्रथम, कारंजा लाड दुसरी, तर बारामती बाजार समितीचा तिसरा क्रमांक**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील कामगिरीच्या आधारे क्रमवारी (रँकिंग) जाहीर झाली आहे. त्यानुसार ३०५ बाजार समित्यांपैकी हिंगणघाट (वर्धा) बाजार समिती पहिल्या क्रमांकावर असून, कारंजा-लाड (वाशिम) दुसऱ्या आणि बारामती (पुणे) बाजार समिती तिसऱ्या क्रमांकावर असल्याची माहिती पणन संचालक विकास रसाळ यांनी दिली. क्रमवारीच्या माहितीचा उपयोग पणन व्यवस्थेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी होऊ शकणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.**

- **आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या समित्यांच्या कामगिरीच्या आधारावर क्रमवारी**
- **खासगी बाजारांचीही क्रमवारी जाहीर; यवतमाळमधील दोन, तर नाशिकमधील एकाचा समावेश**
- **पणन संचालक विकास रसाळ यांची माहिती**

## पहिल्या १० मध्ये मुंबई, पुणे बाजार समिती नाहीच

राज्यात आर्थिक उलाढालीमध्ये प्रथम क्रमांकावर असलेली मुंबई आणि दुसऱ्या क्रमांकावरील पुणे बाजार समितीला पहिल्या दहा समित्यांमध्ये स्थान मिळालेले नसल्याचे दिसून येत आहे. बाजार समित्यांच्या वार्षिक क्रमवारीनुसार राज्यातील पहिल्या १० बाजार समित्या व त्यांना मिळालेले गुण पुढीलप्रमाणे- हिंगणघाट- वर्धा १७८, कारंजा लाड १७१.५, बारामती १६५, लासलगाव (नाशिक) १५७.५, पंढरपूर (सोलापूर) १५५.५, चांदूर बाजार (अमरावती) १५५.५, अकोला (अकोला) १५४.५, उमरेड (नागपूर) १५२.५, अकलूज (सोलापूर) १४९, मंगरुळपीर (वाशिम) १४९, लातूर (लातूर) १४८.५, संगमनेर (अहिल्यानगर) १४८.

तसेच, ६८ खासगी बाजारांपैकी यवतमाळ जिल्ह्यातील कॉटनसिटी अॅग्रो फुड्स प्रा. लि., भोयर हा खासगी बाजार पहिल्या क्रमांकावर आहे. याच जिल्ह्यातील किसान मार्केट यार्ड, शेलू बुद्रुक (ता. पुसद) हा खासगी बाजार दुसऱ्या क्रमांकावर, तर नाशिक जिल्ह्यातील परफेक्ट कृषी मार्केट यार्ड प्रा. लि., नांदूर हा खासगी बाजार तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यभरातील ३०५ बाजार समित्यांची व ६८ खासगी बाजारांची क्रमवारी मागील दोन वर्षांपासून जाहीर करण्यात येत आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने स्मार्ट प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील बाजार समित्यांची आणि खासगी बाजारांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध करणे हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

जागतिक बँकेच्या सूचनेनुसार शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेमध्ये बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधा, आर्थिक व वैधानिक कामकाज, योजना-उपक्रम राबविण्यातील सहभाग यानुसार वार्षिक क्रमवारीसाठी ३५ निकष आणि २०० गुण निश्चित केले आहेत. खासगी बाजारांसाठी ४० निकषांसाठी २५० गुण निश्चित केले आहेत. या निकषांशी संबंधित माहिती तालुका व जिल्हास्तरीय समित्यांनी तपासणी करून गुण दिले आहेत. या गुणांच्या आधारावर राज्यातील बाजार समित्यांची तसेच खासगी बाजारांची सन २०२३-२४ या वर्षाची क्रमवारी निश्चित केली आहे.

बाजार समित्यांची आणि खासगी बाजारांची वार्षिक क्रमवारी जाहीर झाल्यामुळे आपण शेतमाल विक्रीसाठी नेत असलेल्या बाजार समित्यांचे किंवा खासगी बाजारांचे स्थान हे इतर बाजार समित्यांच्या किंवा खासगी बाजारांच्या तुलनेत कोठे आहे, हे शेतकऱ्यांना समजणार आहे.

तसेच, यामुळे शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी अधिकाधिक सुविधा देण्याची निकोप स्पर्धा बाजार समित्यांमध्ये तसेच खासगी बाजारांमध्ये निर्माण होण्यास चालना मिळणार आहे. बाजार समितीचा विकास करताना नेमक्या कोणत्या बाबींना प्राधान्य द्यायचे आहे, बाजार घटकांचे कोणते प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत, याची स्पष्टता क्रमवारीनुसार बाजार समित्यांच्या संचालक मंडळास येणार आहे.

# अमेरिकन, युरोपही भारतीय आंब्याच्या प्रेमात

## विकिरण सुविधा केंद्रातून ६०२ टन आंब्याची निर्यात : बाजार समितीचेही प्रोत्साहन

नामदेव मोरे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** भारतीय आंब्याला जगभरातून पसंती वाढू लागली आहे. आखाती देशांबरोबर अमेरिका, युकेसह अनेक प्रमुख देशांमध्ये हापूसची निर्यात सुरू झाली आहे. पणन मंडळाच्या नवी मुंबईमधील विकिरण सुविधा केंद्रातून आतापर्यंत ६०२ टन आंब्याची निर्यात झाली आहे. बाजार समितीनेही निर्यातदारांसाठी २४ तास मार्केट खुले



केले असून यावर्षी निर्यातीचा टक्का वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनीही व्यक्त केली आहे.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ८० हजार ते १ लाख पेट्यांची रोज आवक होत आहे. कोकण व दक्षिणेकडील राज्यांमधून येणारा आंबा मुंबई, ठाणे, नवी मुंबईतील स्थानिक मार्केटबरोबर विदेशातही पाठविला जात आहे. आंबा निर्यातीला पाठविताना निर्जंतुकीकरणाचे निकष काटेकोरपणे पाळावे लागतात. हॉट वॉटर ट्रीटमेंट व रेडिएशन करावे लागते. यासाठी पणन मंडळाने बाजार समितीजवळ विशेष विकिरण सुविधा केंद्र उभारले आहे.

निर्यातीसाठी बाजार समितीने प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली आहे. निर्यातीच्या कामात अडथळा येऊ नये यासाठी निर्यातदारांना २४ तास बाजारपेठ खुली केली आहे.

\- संगीता अढांगळे, उपसचिव, फळ मार्केट

### दररोज १० टन आंबा जातोय परदेशी

१. पणनच्या केंद्रातून रोज दहा टन आंबा निर्यात होत आहे. आतापर्यंत ऑस्ट्रेलिया व यूएसएला १९० टन, युकेला ४००, जपानला २, न्यूझीलंडला १० टन आंबा निर्यात झाला आहे.

२. याव्यतिरिक्त बाजार समितीमधील १५ निर्यातदारांच्या माध्यमातून आखाती व इतर देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात सुरू आहे. बाजार समितीमध्ये आवक होणाऱ्या आंब्यापैकी जवळपास ६० टक्के मालाची निर्यात होत आहे.

आंबा निर्यातीचे निकष काटेकोरपणे पाळले जातात. विकिरण प्रक्रियेसाठी पणन मंडळाने सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विदेशातूनही चांगली मागणी आहे.

\- मोहन डोंगरे, निर्यातदार

Times of India, 21/04/2025

# India sends pomegranates to the US for first time by sea

Tushar.Pawar
@timesofindia.com

**Nashik:** A consignment of 14 tonnes of pomegranates grown in Maharashtra's Ahilyanagar recently landed in the United States, for the first time via a sea route.

The fruits, all packed in 4,620 boxes, were dispatched from Mumbai and reached New York in the second week of March, within five weeks of departure. In a statement on April 19, the Union Ministry of Commerce said the cargo was met with "exceptional enthusiasm" and quality of the pomegranates — the Bhagwa variety — was reported as "excellent". Previous exports were by air.

Pankaj Chandole



In 2023-24, India exported 72,011 metric tonnes of pomegranates worth $69.08 million

The consignment by sea was dispatched by a Mumbai-based exporter of fruits and vegetables, which is registered with India's Agricultural and Processed Food Products Export Development Authority (APEDA). It was the result of successful joint trials by APEDA and ICAR-National Research Centre for Pomegranate to preserve shelf life of pomegranates for up to 60 days.

The pomegranates were also irradiated at a plant operated by Maharashtra State Agricultural Marketing Board (MSAMB) in Mumbai. According to norms, all fruits being exported to the US have to be irradiated first.

# समुद्री वाहतुकीद्वारे महाराष्ट्राचे डाळिंब अमेरिकेच्या बाजारपेठेत

## वाहतूक खर्च निम्म्यावर; स्पर्धात्मक निर्यातीसाठी महत्त्वाचा टप्पा

**मुकुंद पिंगळे : ॲग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : वाणिज्य मंत्रालयाच्या 'कृषी व प्रक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणा'च्या (अपेडा) माध्यमातून यापूर्वी अमेरिकेत हवाई व समुद्री मार्गाने प्रायोगिक निर्यात चाचणी झाली होती. तर फेब्रुवारी-२०२५ मध्ये तांत्रिक व व्यवहार्य बाजू अभ्यासून महाराष्ट्रात उत्पादित डाळिंबाच्या भगव्या वाणाची समुद्री वाहतुकीद्वारे अमेरिकेच्या बाजारपेठेत यशस्वी निर्यात करण्यात आली आहे.



यापूर्वी झालेली हवाईमार्गे निर्यात खर्चिक होती, आता समुद्री वाहतुकीद्वारे खर्च निम्म्यावर आला. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धात्मक निर्यातीसाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

औषधी गुणधर्म व पोषण मूल्यांमुळे डाळिंबाची विशेष मागणी असते. देशात प्रामुख्याने महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, राजस्थान आणि आंध्र प्रदेशमध्ये लागवडी आहेत. प्रमुख निर्यात होणाऱ्या देशांमध्ये संयुक्त अरब अमिराती (यूएई), बांगलादेश, नेपाळ, नेदरलँड, सौदी अरेबिया, श्रीलंका, थायलंड, बहरीन, ओमान यांसह अमेरिकेचा समावेश आहे. मात्र २०१८ मध्ये अमेरिकेत सुरू असलेली निर्यात तांत्रिक कारणांमुळे ५ वर्षे ठप्प झाली. निर्यात पूर्ववत करण्यासाठी 'अपेडा' व कृषी मंत्रालयाच्या राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्थायांनी संयुक्तरीत्या अमेरिकेच्या कृषी विभागाकडे पाठपुरावा केला. २०२२ मध्ये निकष व निर्यात पद्धती निश्चित होऊन पुन्हा निर्यात सुरू होण्यास हिरवा झेंडा मिळाला.

'अपेडा', 'युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चर', 'ॲनिमल अँण्ड प्लांट हेल्थ इन्स्पेक्शन सर्व्हिस', 'राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्था' आणि राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र (सोलापूर) यांचे संयुक्त कामकाज तर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील किरणोत्सर्ग सुविधा केंद्रावर प्रक्रिया करून जुलै-२०२३ मध्ये हवाई मार्गाने निर्यात चाचणी झाली.

> 'अपेडा'ने प्री-क्लिअरन्स प्रोग्रामला निधी देऊन आंबा आणि डाळिंब यासारख्या भारतीय फळांच्या अमेरिकेतील निर्यातीला पाठिंबा दिला आहे. प्रीमियम आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत फळे निर्यात झाल्यानंतर भारतीय शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल.
> - **अभिषेक देव,** अध्यक्ष-अपेडा

> अमेरिकन ग्राहकांकडून गुणवत्तापूर्ण फळांची मागणी आहे. नोव्हेंबर-२०२४ पासून डाळिंब निर्यातसंदर्भात कामकाज सुरू केले. हवाई वाहतुकीमार्गे सुरुवात केली; मात्र त्यात वाहतूक खर्च अधिक होता, त्यामुळे मागणी कमी होती. आता समुद्री वाहतुकीचे निकष निश्चित करून डाळिंब पाठवले आहे. त्यामुळे वाहतुकीचा खर्च निम्म्यावर आल्याचे समोर आले.
> - **कौशल खखर,** मुख्य कार्यकारी अधिकारी, केबी एक्स्पोर्टस

### पाच आठवड्यांत डाळिंब अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर

अमेरिकेत समुद्री वाहतुकीमार्गे प्रायोगिक निर्यातीच्या पहिल्या प्रयत्नात डाळिंब संशोधन केंद्राच्या तांत्रिक सहकार्याने साठवणूक क्षमता ६० दिवसांपर्यंत वाढवण्यासंबंधी स्थिर चाचण्या घेण्यात आल्या. या वेळी प्रायोगिक तत्त्वावर ४,२०० पेट्यांमधून १२.६ टन डाळिंब गेला होता. तर अलीकडेच फेब्रुवारी-२०२५ मध्ये पुन्हा 'अपेडा' नोंदणीकृत शेतीमाल निर्यातदार केबी एक्स्पोर्ट यांच्या माध्यमातून जेएनपीटी बंदरावरून निर्यात यशस्वी झाली. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात सुमारे १४ टन वजनाच्या ४,६२० पेट्यांची शिपमेंट ५ आठवड्यांच्या आत अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर पोहोचली. न्यू यॉर्कमध्ये माल पोहोचल्यानंतर 'गुणवत्ता' असल्याचे नोंदविण्यात आले. आकर्षक व चवीमुळे भगवा वाण ग्राहकांच्या पसंतीस उतरला आहे. पणनमंत्री जयकुमार रावल, 'अपेडा'च्या सरव्यवस्थापक विनीता सुधांशु, अपेडा मुंबई कार्यालयाचे प्रशांत वाघमारे, पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, मुंबई फायटो सॅनिटरी विभागाचे प्रमुख ब्रजेश मिश्रा यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे.

लोकमत

मस्ट READ

# अवघ्या १७ दिवसांत ८३१ टन हापूस निर्यात

## अमेरिकेला सर्वाधिक आंबा रवाना : युरोपाचीही पसंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** कृषी पणन मंडळाच्या नवी मुंबईतील वीकिरण सुविधा केंद्रातून १७ दिवसांत ८३१ टन आंबा निर्यात झाला आहे. अमेरिकेला सर्वाधिक ३७२ टन आंबा रवाना झाला असून, गुजरात व दक्षिणेकडील राज्यांमधील निर्यातदारांनाही या केंद्राचा लाभ होत आहे.

फळे व भाजीपाला निर्यातीला चालना देण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळाने नवी मुंबईमध्ये अत्याधुनिक विकिरण सुविधा उपलब्ध केली आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलियासह जगभरातील



महत्त्वाच्या देशांमध्ये निर्जुतुकीकरणाचे सर्व निकष पाळून आंबा निर्यातीची सुविधा येथे उपलब्ध आहे. १ एप्रिलपासून प्रत्यक्षात निर्यात सुरू झाली आहे. अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी याठिकाणी आंब्याची गुणवत्ता तपासण्यासाठी आले असून, त्यांनी हिरवा कंदील दिल्यानंतरच आंबा निर्यात केला जात आहे. दोन आठवड्यांत आयएफसी प्रक्रिया करून तब्बल ३७२ टन आंबा अमेरिकेला निर्यात केला आहे.

## उद्दिष्ट ४ हजार टनांचे

आयएफसी प्रक्रिया करून एकूण ३८३, व्हीएचटी प्रक्रिया करून ४.३९ टन व व्हीपीएफ प्रक्रिया करून ४४३, असा एकूण ८३१ टन आंबा निर्यात केला आहे. यावर्षी ४ हजार टन निर्यातीचे उद्दिष्ट असून, ते पूर्ण करण्यासाठी पणन मंडळाच्या माध्यमातून निर्यातदारांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

### १ ते १७ एप्रिलदरम्यानची निर्यात

| देश | आंबा निर्यात टन |
|---|---|
| अमेरिका | ३७२ |
| युके | ३२७.६४ |
| इतर युरोपीयन देश | ११५.९३ |
| ऑस्ट्रेलिया | ११.८४ |
| न्यूझीलंड | ४.३९ |



## पणनच्या केंद्राला सर्वाधिक पसंती

देशात पाच केंद्रांमधून विकिरण प्रक्रिया करून आंबा निर्यात केला जात आहे. यापैकी सर्वाधिक पसंती पणन मंडळाच्या नवी मुंबईतील केंद्राला मिळत आहे.

**येथे व्हीपीएफ व व्हीएचटी सुविधा केंद्र आहे. महाराष्ट्रासह गुजरात व दक्षिणेकडील राज्यामधील निर्यातदारांनीही त्यांच्याकडील आंबा या केंद्रावरून निर्यात करण्यास पसंती दिली आहे.**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# मॅग्नेट प्रकल्पांतर्गत रशियाला केळीची चाचणी निर्यात यशस्वी

- २२ टन केळी निर्यात
- सरासरी ९१ रुपये प्रतिकिलो दर
- केळीसह अन्य शेतमाल निर्यातीस नवीन बाजारपेठ उपलब्ध

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्याच्या सहकार व पणन विभागाद्वारे आशियाई विकास बँकेच्या (एडीबी) अर्थसाहाय्याने महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राबविण्यात येत आहे. मॅग्नेट प्रकल्पांतर्गत १५ नोव्हेंबर २०२४ रोजी रशियाला प्रथमच जहाजाद्वारे २२ टन केळी निर्यात करण्यात आली. त्यापैकी जवळपास नव्वद टक्के केळी सुस्थितीत पोहचली. त्यास सरासरी ९१ रुपये प्रतिकिलो दर मिळाला असून, भारतीय केळीसह अन्य शेतमाल निर्यातीस रशिया ही नवीन बाजारपेठ उपलब्ध झाल्याचे कळविण्यात आले आहे.

मॅग्नेट प्रकल्पाचे लाभार्थी असलेल्या मे. किरण डोके फ्रुट सप्लायर्स (मूल्यसाखळी गुंतवणूकदार) यांच्यामार्फत मॅग्नेट प्रकल्प व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या मार्गदर्शनाखाली व प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार कंपनीच्या मदतीने ही निर्यात करण्यात आली. मॅग्नेट प्रकल्पाद्वारे राज्यातील लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे उद्दिष्ट असून केळी, डाळिंब, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची, फुले, आंबा, लिंबू, काजू व पडवळ या निवडक १५ फलोत्पादन पिकांच्या मूल्यसाखळ्यांचा विकास करण्यात येत आहे. तसेच प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील कृषी उत्पादने युरोप व विकसित नवनवीन आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये पोहचण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.



**महाराष्ट्रातून प्रथमच रशियाला केळीची निर्यात करण्यात आली.**

मॅग्नेट प्रकल्पाच्या माध्यमातून सुरुवातीला केळी, डाळिंब व मिरची या पिकांबाबत वेगनिंगन विद्यापीठ नेदरलँड, प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार के.पी.एम.जी. व महाराष्ट्र कृषी पणन मंडळाच्या सहाकार्याने प्राथमिक चाचण्या घेण्यात आल्या. रशियासारख्या मोठ्या बाजारपेठेत भारतातील फलोत्पादन मूल्यसाखळी अधिक दृढ करण्यासाठी हे पाऊल अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

Agrowon, 18/04/2025

# एकवीस जिल्ह्यांमध्ये होणार ६५ बाजार समित्या

## नव्याने स्थापनेस राज्य शासनाची मंजुरी

ॲग्रोवन वृत्तसेवा

**मुंबई :** मुख्यमंत्री बाजार समिती योजनेअंतर्गत पणन विभागाच्या वतीने राज्यातील २१ जिल्ह्यांतील ६५ तालुक्यांमध्ये नव्या बाजार समित्या सुरू करण्यात येणार आहेत. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर १०० दिवस आराखड्यानुसार कृती कार्यक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्यात बाजार समित्या सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, गडचिरोली आणि कोल्हापूर जिल्ह्यांत सर्वाधिक तालुक्यांत बाजार समित्या सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात सध्या ३०५ बाजार समित्या कार्यरत असून, या बाजार समित्यांचे ६२५ उपबाजार कार्यरत आहेत. तर राज्यातील ६८ तालुक्यांत बाजार समित्या नव्हत्या.

पान ४ वर »

### ९१ बाजार समित्या तोट्यात; ४१ बंद करण्याचा प्रस्ताव

राज्यातील ३०५ बाजार समित्यांमधील ९१ बाजार समित्या तोट्यात असून, ४१ बाजार समित्या बंद करण्याचा प्रस्ताव पणन विभागाने राज्य शासनाला यापूर्वीच सादर केलेला असताना, नव्याने ६५ बाजार समित्या स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पणन विभागाने काही वर्षांपूर्वी बाजार समित्यांबाबत केलेल्या सर्वेक्षणानुसार अ, ब, क, ड असे सर्वेक्षण केले होते. यानुसार काही बाजार समित्यांकडे जागा आहेत, पण शेतीमालाची आवक होत नाही. जागा आहे, पण कार्यालय नाही, कार्यालय आहे पण जागा नाही, अशी परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत उत्पन्नच नसल्याने, कर्मचाऱ्यांचे वेतनदेखील होऊ शकत नाही. त्यामुळे ९१ बाजार समित्या तोट्यात आणि ४१ बंदचा प्रस्ताव हवाल राज्य शासनाला सादर केला होता.

Agrowon, 18/04/2025

# एकवीस जिल्ह्यांमध्ये होणार ६५ बाजार समित्या

» पान १ वरून

पणन विभागामार्फत पुढील १०० दिवसांच्या करावयाच्या कृती कार्यक्रमांतर्गत नव्याने बाजार समित्या स्थापन करण्याचे सादरीकरण करण्यात आले होते. त्यानसुार मुख्यमंत्री बाजार समिती योजनेअंतर्गत तालुका स्तरावर बाजार समित्या स्थापन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. अर्थसंकल्पातील भाषणादरम्यानही एक तालुका एक बाजार समितीची घोषणा केली होती. सध्या राज्यात ६८ तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नसली तरी मुंबई उपनगरातील कुर्ला, अंधेरी, बोरिवली या तालुक्यांत शहरी भाग असल्याने कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करणे व्यावहारिक नाही. तसेच जालना बाजार समितीचे विभाजन होऊन बदनापूर बाजार समिती निर्माण झाली आहे. तसेच या बाजार समितीप्रश्नी उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. उर्वरित ६५ तालुक्यांमध्ये बाजार समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, जळगाव, अमरावती, पुणे, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, बीड, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यांत या बाजार समित्या स्थापन करण्यात येणार आहेत.

सध्या राज्यात ३०५ बाजार समित्या असून ३० बाजार समित्यांचे उत्पन्न २५ लाखांपेक्षा कमी आहे, तर २७ बाजार समित्यांचे उत्पन्न २५ ते ५० लाखांच्या दरम्यान आहे. एक कोटीच्या आत उत्पन्न असलेल्या ५४ बाजार समित्या आहेत, तर २५ कोटींपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या पाच बाजार समित्या आहेत. यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर आणि लातूर बाजार समित्यांचा समावेश आहे. तर 'ड' वर्गातील म्हणजे २५ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या ३० बाजार समित्या याही तालुकापातळीवरील आहेत.

नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या बाजार समित्यांसाठी पणन संचालकांनी निकष स्थापित करावेत, असे आदेश देण्यात आले आहेत. तसेच रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील बाजार समित्यांसाठी किमान पाच एकर, तर उर्वरित जिल्ह्यांसाठी किमान १० ते १५ एकर जमीन आवश्यक आहे.

## येथे स्थापन होणार बाजार समित्या

**सिंधुदुर्ग :** कणकवली, वैभववाडी, देवगड, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ले, दोडामार्ग

**रत्नागिरी :** संगमेश्वर, लांजा, राजापूर, चिपळूण, गुहागर, दापोली, मंडणगड, खेड

**रायगड :** उरण, टाळा, सुधागड-पाली, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हासळा

**ठाणे :** अंबरनाथ

**पालघर :** तलासरी, जवाहर, मोखाडा, वाडा, विक्रमगड

**नाशिक :** पेठ, त्र्यंबकेश्वर

**जळगाव :** एरंडोल, मुक्ताईनगर, भडगाव

**अमरावती :** भातकुली, चिखलदरा

**पुणे :** वेल्हा

**नागपूर :** नागपूर ग्रामीण

**भंडारा :** मोहाडी, साकोली

**गोंदिया :** सालकसा

**गडचिरोली :** धानोरा, मुलचेरा, देसाईगंज, कुरखेडा, कोर्ची, एटापल्ली, भामरागड

**चंद्रपूर :** बल्लारपूर, जिवती

**नांदेड :** अर्धापूर

**छत्रपती संभाजीनगर :** खुलताबाद, सोयगाव

**बीड :** शिरूर कासार

**सोलापूर :** सोलापूर दक्षिण

**सातारा :** महाबळेश्वर

**सांगली :** कवठेमहाकांळ, जत, कडेगाव

**कोल्हापूर :** पन्हाळा, शाहूवाडी, कागल, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, चंदगड, आजरा

## २०२ बाजार समित्यांची उत्पन्न मर्यादा अडीच कोटींच्या आत

राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या ३०५ पैकी १०३ बाजार समित्यांची उत्पन्न मर्यादा पाच कोटी ते २५ कोटींपर्यंत आहे. तर २०२ बाजार समित्यांची उत्पन्न मर्यादा २५ लाख ते अडीच कोटींपर्यंत आहे. बहुतांश बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या डबघाईला आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी पणन विभागाने बाजार समित्यांचे एकूण उत्पन्न, खर्च, वाढावा, तूट आदींचे मूल्यमापन करून बाजार समित्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

अॅग्रोवन

# पुण्यात चार ठिकाणी आंबा महोत्सव सुरू

## दहा दिवसांत एक कोटी रुपयांच्या आंब्याची विक्री; उत्पादक ते ग्राहक थेट विक्री

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : राज्य कृषी पणन मंडळ आयोजित केलेल्या आंबा महोत्सवास चोखंदळ हापूस प्रेमींचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यावर्षी ग्राहकांना कोकणातील दर्जेदार, शुद्ध आणि अस्सल 'यूआयडी टॅग' प्राप्त आंबा ग्राहकांना आता पुण्यात चार विविध ठिकाणी उपलब्ध झाला आहे. गेल्या १० दिवसांत एक कोटी रूपयांच्या आंब्याची विक्री झाली आहे.

दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेअंतर्गत मार्केट यार्डात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मात्र पुणेकरांसाठी प्रथमच पुणे शहरात मार्केट यार्डसह इतर तीन ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. 'जीआय' आणि 'यूआयडी टॅग' लावलेला आंबा ग्राहकांना विकला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत असून ग्राहकांचीही फसवणूक होत नाही. या महोत्सवात १५० शेतकऱ्यांना १२० स्टॉल उपलब्ध केले आहेत. त्यात हापूस, केसर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे.

यामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे जिल्ह्यांतील भौगोलिक मानांकन (जीआय) मिळालेला हापूस आंबा, तसेच राज्यातील केसर, पायरी व इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

महोत्सवात १७५ ते ३०० ग्रॅम वजनाच्या आंब्याची विक्री करण्यात येत आहे. यात ७०० ते १५०० रुपये प्रति डझन भाव आहे. महोत्सवाच्या पहिल्या १० दिवसांमध्ये १५ हजार डझन आंब्याची विक्री झाली. त्यातून सुमारे एक कोटीची उलाढाल झाल्याची माहिती पणन मंडळाने दिली.

### आंबा महोत्सवाची ठिकाणे

पणन मंडळामार्फत एक एप्रिल ते ३१ मेपर्यंत मार्केट यार्डातील 'पीएपीएमएल'च्या बस डेपोजवळ गेट क्रमांक नऊ मार्केट यार्ड, गांधी भवन मैदान-कोथरूड, मगरपट्टा-सिझन्स मॉलजवळ खेळाचे मैदान आणि झेन्सार कंपनीजवळील खेळाचे मैदान, खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे.



पुणे : पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात जीआय टॅगिंगच्या विशिष्ट सांकेतिक क्रमांकाची माहिती ग्राहकांना देताना देशांतर्गत व्यापार विकास विभाग व्यवस्थापक सुहास काळे.

> यंदा पहिल्या टप्प्यातील आंबा कमी होता. मात्र आता दुसऱ्या टप्प्यातील आंब्याचे नियमित उत्पादन सुरू झाले असून, हंगाम सुरळीत झाला आहे. यंदाच्या महोत्सवाचे वैशिष्ट्ये हे जीआय टॅगिंग आंबा उपलब्ध आहे. प्रत्येक फळावरील विशिष्ट सांकेतांक क्रमांकाच्या माध्यमातून ते फळ कोणत्या शेतकऱ्यांच्या बागेतून आले आहे. त्याची सविस्तर माहिती उपलब्ध होत आहे. याद्वारे कोकणातील अस्सल हापूस शेतकऱ्याकडून थेट ग्राहकांना मिळत आहे.
>
> - सुहास काळे, व्यवस्थापक, देशांतर्गत व्यापार विकास विभाग

Agrowon, 10/04/2025

# राज्यात बाजार समित्यांचे सुधारित वर्गीकरण

## १ ते २.५ कोटींपर्यंत उत्पन्न असलेल्या बाजार समित्यांची संख्या सर्वाधिक

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : राज्यात ३०५ कृषी उत्पन्न बाजार समित्या असून, या समित्यांचे ६२५ उपबाजार आवर कार्यरत आहेत. राज्य शासनाने बाजार समित्यांच्या उत्पन्नानुसार वर्गीकरण केले आहे. ज्यात यापूर्वी 'अ','ब','क' व 'ड' असे चार वर्ग होते. यावर्षी चार वर्गांसह 'अ' वर्गात १ ते ५ तारांकित असे उपवर्गीकरण केले आहे. राज्यातील सर्वांत कमी ५ बाजार समित्या 'अ' वर्ग पंचतारांकित म्हणून निवडल्या गेल्या आहेत. तर 'अ' वर्गमध्ये एक तारांकित बाजार समित्यांमध्ये राज्यातील सर्वांत जास्त ९१ बाजार समित्या आहेत.

पान ४ वर »

# राज्यात बाजार समित्यांचे सुधारित वर्गीकरण

» पान १ वरून

शासनाच्या ३ एप्रिल २००१ पत्रांनुसार बाजार समित्यांचे यापूर्वी 'अ','ब','क' व 'ड' या चार वर्गांत वर्गीकरण करण्यात येत होते. त्यामध्ये 'अ' वर्गामध्ये १ कोटीपेक्षा जास्त,'ब' वर्गामध्ये ५० लाख ते १ कोटी,'क' वर्गात २५ ते ५० लाख व 'ड'मध्ये २५ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा समावेश आहे. २०२३-२४ अखेर राज्यातील 'अ' वर्गामध्ये १९४, 'ब' मध्ये ५४, 'क' मध्ये २७ व 'ड' मध्ये ३० बाजार समित्यांचा समावेश आहे. बाजार समित्यांचे आस्थापना खर्च मर्यादेबाबत शासनाने २८ ऑगस्ट २०१४ रोजी परिपत्रक काढले आहे. त्यानुसार 'अ' वर्ग बाजार समिती आस्थापना खर्च मर्यादा ४५ टक्के, 'ब' वर्ग बाजार समिती आस्थापना खर्च मर्यादा ५० टक्के, 'क' व 'ड' वर्गीय बाजार समिती आस्थापना खर्चामध्ये १० टक्के वाढ करण्याबाबत पणन मंडळ यांनी बाजार समित्यांची आर्थिक परिस्थिती तपासून निर्णय घ्यावा, असे नमूद केले आहे.

पणन विभागामार्फत पुढील १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमात राज्यातील सध्याच्या १ कोटीपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या बाजार समित्यांचे १ ते २.५ कोटी, २.५ ते ५ कोटी, ५ ते १० कोटी, १० ते २५ कोटी व २५ कोटींपेक्षा जास्त असे उपवर्गीकरण हा मुद्दा समाविष्ट करण्यात आला होता. त्यानुसार पणन संचालकांच्या २७ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्रानुसार 'अ' वर्गीय कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे उपवर्गीकरणासह 'ब','क' व 'ड' बाजार समित्यांच्या वर्गीकरणाबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्या अनुषंगाने 'अ'वर्गीय कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे उपवर्गीकरण तसेच 'ब','क' व 'ड' बाजार समित्यांचे वर्गीकरणाच्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. पणन संचालकांच्या शिफारशीनुसार बाजार समितीच्या वर्गीकरणास शासनाने मान्यता दिली.

### ...असे आहे वर्गीकरण

| वर्गवारी | उत्पन्न मर्यादा | बाजार समित्या |
|---|---|---|
| अ (पंच तारांकित) | २५ कोटींपेक्षा जास्त | ५ |
| अ (चार तारांकित) | १० ते २५ कोटी | १५ |
| अ (तीन तारांकित) | ५ ते १० कोटी | २३ |
| अ (दोन तारांकित) | २.५ ते ५ कोटी | ६० |
| अ (एक तारांकित) | १ ते २.५ कोटी | ९१ |
| ब | ५० लाख ते १ कोटी | ५४ |
| क | २५ ते ५० लाख | २७ |
| ड | २५ लाखांपेक्षा कमी | ३० |

**'अ' वर्ग पंचतारांकित बाजार समित्या :** मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर, लातूर

**'अ' वर्ग चार तारांकित बाजार समिती**

हिंगणघाट(वर्धा), पिंपळगाव बसवंत (नाशिक), कोल्हापूर, अमरावती, खामगाव (बुलडाणा), लासलगाव (नाशिक), अहिल्यानगर, सांगली, जालना, जुन्नर (पुणे), कल्याण (ठाणे), अकोला, भिवंडी (ठाणे), बार्शी (सोलापूर)

Punyanagari, 09/04/2025

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात यूआयडी टॅगमुळे फायदा

**पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आयोजित आंबा महोत्सवात पहिल्या आठ दिवसांमध्ये १० हजार डझन आंब्याची विक्री झाली असून, सुमारे ९० लाखांची उलाढाल झाली आहे. ग्राहकांना कोकणातील दर्जेदार हापूस आंबा मिळत आहे. जीआय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. दरवर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत मार्केट यार्डात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

पुणेकर ग्राहकांसाठी प्रथमच पुणे शहरात मार्केटयार्ड सह इतर ३ ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पणन मंडळामार्फत १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत पीएमटी बस डेपोजवळ गेट नंबर मार्केटयार्ड, गांधी भवन मैदान-कोथरूड, मगरपट्टा- सिझन्स मॉलजवळ खेळाचे मैदान आणि झेन्सार कंपनीजवळील खेळाचे मैदान, खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवांचे आयोजन केले आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (जीआय) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

> पणन मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंबा महोत्सवातील आंब्यांना ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यंदा उत्पादन कमी असल्यामुळे हंगाम १० ते १५ मे पर्यंतच सुरु राहील त्यामुळे ग्राहकांनी देवगड हापूस खरेदी करुन चव चाखावी.
>
> **- अमित शिर्सेकर,** आंबा उत्पादक शिरसे-सांगवे ता. देवगड



महोत्सवामध्ये १५० उत्पादकांना १२० स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे. महोत्सवामध्ये साधारण १७५ ते ३०० ग्रॅम वजानाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून ७०० ते १५०० रुपये प्रति डझन दर आहे.

सकाळ



**मार्केट यार्ड :** महोत्सवात आलेला 'यूआयडी टॅग' हापूस आंबा.

# पुणेकरांना लागली 'हापूस'ची गोडी

## ग्राहकांना 'यूआयडी टॅग' आंबा

**मार्केट यार्ड, ता. ८ :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आयोजित केलेल्या आंबा महोत्सवास पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. 'यूआयडी टॅग'मुळे ग्राहकांना दर्जेदार आणि कोकणातील हापूस आंबा मिळत आहे.

दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेअंतर्गत मार्केट यार्डात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मात्र, पुणेकरांसाठी प्रथमच पुणे शहरात मार्केट यार्डसह इतर तीन ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. 'जीआय' आणि 'यूआयडी टॅग' लावलेला आंबा ग्राहकांना विकला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत असून ग्राहकांचीही फसवणूक होत नाही. या महोत्सवात १५० शेतकऱ्यांना १२० स्टॉल उपलब्ध केले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे.

पणन मंडळामार्फत एक एप्रिल ते ३१ मेपर्यंत मार्केट यार्डातील पीएमपी बस डेपोजवळ गेट क्रमांक नऊ पान २ वर »

### आठ दिवसांत ९० लाखांची उलाढाल

**महोत्सवात १७५ ते ३०० ग्रॅम वजनाच्या आंब्याची विक्री करण्यात येत आहे. यात ७०० ते १५०० रुपये प्रतिडझन भाव आहे. महोत्सवाच्या पहिल्या आठ दिवसांमध्ये १० हजार डझन आंब्याची विक्री झाली. त्यातून सुमारे ९० लाखांची उलाढाल झाल्याची माहिती पणन मंडळाने दिली.**



### ...असा आहे फरक

| गुणधर्म | कोकण हापूस | कर्नाटक आंबा |
|---|---|---|
| सुगंध (वास) | मधुर सुगंध | सुगंध येत नाही |
| वजन | हातात घेतल्यानंतर साधारण | जडसर |
| साल | पातळ | जाड |
| गर | केशरी | पिवळा (हळदीसारखा) |
| आकार | थोडासा उभट | गोलाकार |
| गोडी | गोड (खाल्ल्यानंतर हाताला वास राहतो) | तुरट गोड |

सकाळ

# पुणेकरांना लागली ‘हापूस’ची गोडी

पान १ वरून

मार्केट यार्ड, गांधी भवन मैदान-कोथरूड, मगरपट्टा-सिझन्स मॉलजवळ खेळाचे मैदान आणि झेन्सार कंपनीजवळील खेळाचे मैदान, खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. यामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे जिल्ह्यांतील भौगोलिक मानांकन (जीआय) मिळालेला हापूस आंबा, तसेच राज्यातील केशर, पायरी व इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

> यंदा केवळ ४० टक्के उत्पादन आहे. कोकणातील दर्जेदार हापूस आंबा शेतकऱ्याकडून थेट ग्राहकांना मिळत आहे. दर्जातील सातत्यामुळे ग्राहकांची आंब्याला पसंती आहे.
>
> **- सुहास काळे**, व्यवस्थापक, देशांतर्गत व्यापार विकास विभाग

---

> यंदा आंब्याचे उत्पन्न कमी आहे. मात्र, पुणेकर खवय्ये म्हणून ओळखले जातात. त्यामुळे मागणी चांगली आहे. महोत्सवात कोकणातील दर्जेदार हापूस ग्राहकांना मिळत आहे. पणन मंडळाच्या माध्यमातून उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे.
>
> **- अमित शिरसेकर**, आंबा उत्पादक शेतकरी, देवगड

## प्रतिसाद का?

- कोकणातील हापूस आंबा शेतकऱ्याकडून उपलब्ध
- रत्नागिरी, देवगड हापूस स्वतः शेतकरी विक्री करतात
- शेतकऱ्यांची नोंदणी करून लॉटरी पद्धतीने स्टॉल देण्यात येतात
- आंबा उत्पादकांना भौगोलिक मानांकन असल्याने ‘जीआय टॅग’ लावून विक्री
- आंब्याची वजनानुसार एक ते सात क्रमांक अशी वर्गवारी
- सर्वसाधारणपणे आंबा एक किंवा दोन डझनाच्या बॉक्समध्ये विक्री

Pune, Pune-Today
09/04/2025 Page No. 2

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाकडे ग्राहकांचा ओघ.युआयडी टॅग मुळे होतोय फायदा..

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ ओयोजित आंबा महोत्सवास चांगला प्रतिसाद मिळत आहे. ग्राहकांना कोकणातील दर्जेदार हापूस आंबा मिळत आहे. दरवर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत मार्केट यार्डात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मात्र पुणेकर ग्राहकांसाठी प्रथमच पुणे शहरात मार्केटयार्ड सह इतर ३ ठिकाणी आंबा महोत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे.



पणन मंडळामार्फत दि. १ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत पीएमटी बस डेपोजवळ गेट नंबर ९ मार्केटयार्ड, गांधी भवन मैदान– कोथरूड, मगरपट्टा– सिझन्स मॉलजवळ खेळाचे मैदान आणि झेन्सार कंपनीजवळील खेळाचे मैदान, खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवांचे आयोजन केले आहे.

या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (Geographical Indication-GI) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

जीआय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. महोत्सवामध्ये १५० उत्पादकांना १२० स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे.

महोत्सवामध्ये साधारण १७५ ते ३०० ग्रॅम वजानाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून रू.७०० ते १५०० प्रति डझन दर आहे. महोत्सवाच्या पहिल्या आठ दिवसांमध्ये १०,००० डझन आंब्याची विक्री झाली असुन सुमारे ९० लाखाची उलाढाल झाली आहे.

Rashtraroop, 08/04/2025

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाकडे ग्राहकांचा ओघ.युआयडी टॅग मुळे होतोय फायदा



**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ ओयोजित आंबा महोत्सवास चांगला प्रतिसाद मिळत आहे. ग्राहकांना कोकणातील दर्जेदार हापूस आंबा मिळत आहे. दरवर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत मार्केट यार्डात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

मात्र पुणेकर ग्राहकांसाठी प्रथमच पुणे शहरात मार्केटयार्ड सह इतर ३ ठिकाणी आंबा महोत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे.

पणन मंडळामार्फत दि. १ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत पीएमटी बस डेपोजवळ गेट नंबर ९

मार्केटयार्ड, गांधी भवन मैदान–कोथरूड, मगरपट्टा–सिझन्स मॉलजवळ खेळाचे मैदान आणि झेन्सार कंपनीजवळील

खेळाचे मैदान, खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवांचे आयोजन केले आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (Geographical Indication-GI) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

जीआय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांनाचांगला भाव मिळत आहे. महोत्सवामध्ये १५० उत्पादकांना १२० स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि विटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे.

महोत्सवामध्ये साधारण १७५ ते ३०० ग्रॅम वजानाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून रू.७०० ते १५०० प्रति डझन दर आहे. महोत्सवाच्या पहिल्या आठ दिवसांमध्ये १०,००० डझन आंब्याची विक्री झाली असुन सुमारे ९० लाखाची उलाढाल झाली आहे.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# आंबा महोत्सवात ९० लाखांची उलाढाल

- ग्राहकांचा आंबा खरेदीला प्रतिसाद
- प्रतिडझनाचा दर ७०० ते १५०० रुपये



पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात थेट उत्पादक शेतकऱ्यांकडून आंबा खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी वाढू लागली आहे.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुढाकाराने शेतकरी ते थेट ग्राहक उपक्रमातंर्गत सुरू केलेल्या आंबा महोत्सवास ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. १ एप्रिलपासून सुरू झालेल्या महोत्सवात आतापर्यंत दहा हजार डझन आंब्यांची विक्री पूर्ण झाली असून सुमारे ९० लाख रुपयांची उलाढाल झाली आहे. तर आंब्यांचा प्रति डझनाचा दर ७०० ते १५०० रुपयांपर्यंत आहे.

पुणेकर ग्राहकांना कोकणातील दर्जेदार हापूस आंबा खरेदीची संधी उपलब्ध झाली आहे. पणन मंडळामार्फत १ एप्रिल ते ३१ मेपर्यंत आंबा महोत्सव सुरू राहणार आहे. मार्केट यार्डात पीएमटी बस डेपोजवळ गेट नंबर ९ मार्केटयार्ड तसेच गांधी भवन मैदान-कोथरूड, मगरपट्टा- सिझन्स मॉलजवळ खेळाचे मैदान आणि झेन्सार कंपनीजवळील खेळाचे मैदान, खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवांचे आयोजन केले आहे. महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यांतील भौगोलिक मानांकन मिळालेला हापूस तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

जीआय व यूआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. महोत्सवामध्ये १५० उत्पादकांना १२० स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे. महोत्सवामध्ये साधारण १७५ ते ३०० ग्रॅम वजानाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असल्याचे मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाकडे ग्राहकांचा ओघ.युआयडी टॅग मुळे होतोय फायदा..

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ ओयोजित आंबा महोत्सवास चांगला प्रतिसाद मिळत आहे. ग्राहकांना कोकणातील दर्जेदार हापूस आंबा मिळत आहे. दरवर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत मार्केट यार्डात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मात्र पुणेकर ग्राहकांसाठी प्रथमच पुणे शहरात मार्केटयार्ड सह इतर ३ ठिकाणी आंबा महोत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे.

पणन मंडळामार्फत दि. १ एप्रिल ते ३१ मे २०२५ या कालावधीत पीएमटी बस डेपोजवळ गेट नंबर ९ मार्केटयार्ड, गांधी भवन मैदान–कोथरूड, मगरपट्टा–सिझन्स मॉलजवळ खेळाचे मैदान आणि झेन्सार कंपनीजवळील खेळाचे मैदान,




खराडी या चार ठिकाणी आंबा महोत्सवांचे आयोजन केले आहे. या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (Geographical Indication-GI) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध आहे.

जीआय व युआयडी टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. महोत्सवामध्ये १५० उत्पादकांना १२० स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा समावेश आहे.

महोत्सवामध्ये साधारण १७५ ते ३०० ग्रॅम वजानाच्या आंब्याची विक्री करण्यात येत असून रू.७०० ते १५०० प्रति डझन दर आहे. महोत्सवाच्या पहिल्या आठ दिवसांमध्ये १०,००० डझन आंब्याची विक्री झाली असुन सुमारे ९० लाखाची उलाढाल झाली आहे.

Loksatta, 08/04/2025

# सात दिवसांत १० हजार डझन आंब्यांची विक्री

## पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात ९० लाखांची उलाढाल

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित आंबा महोत्सवाच्या पहिल्या सात दिवसांत १० हजार डझन आंब्यांची विक्री झाली असून, ९० लाखांची उलाढाल झाली आहे. पणन मंडळाकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती देण्यात आली आहे.

आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव आणि ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा, या उद्देशाने राज्याच्या पणन मंडळाकडून शहरात चार ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मार्केट यार्ड, कोथरूड येथील गांधी भवन, मगरपट्टा आणि खराडी या चार ठिकाणी महोत्सवाला १ एप्रिलपासून सुरुवात झाली असून, तो ३१ मे पर्यंत असणार आहे. महोत्सवाच्या पहिल्या सात दिवसांतच १० हजार डझन आंब्यांची प्रति डझन ७०० ते १५०० रुपये दराने विक्री झाली. महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यांतील भौगोलिक मानांकन मिळालेले हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी आणि अन्य वाणांचा आंबा उपलब्ध होणार आहे. जीआय आणि यूआयडी टॅग असलेला आंब्यांची ग्राहकांना विक्री केली जात आहे. महोत्सवात १५० उत्पादकांना १२० स्टॉल्स उपलब्ध करून दिले असून, हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंब्याचा त्यामध्ये समावेश आहे. १७५ ते ३०० ग्रॅम वजनाच्या आंब्याची विक्री केली जात आहे.

Jasal Ganga, 08/04/2025

# विपणन बोर्ड के आम महोत्सव में उमड़े उपभोक्ता, यूआईडी टैग से लाभ मिल रहा

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड द्वारा आयोजित आम महोत्सव को अच्छी प्रतिक्रिया मिल रही है। ग्राहकों के लिए कोंकण से गुणवत्तायुक्त हापुस आम उपलब्ध हैं। हर साल, उत्पादक-से-उपभोक्ता प्रत्यक्ष बिक्री ३ योजना के अंतर्गत बाजार प्रांगण में आम महोत्सव का आयोजन किया जाता है। हालाँकि, पुणे के ग्राहकों के लिए पहली बार पुणे शहर में मार्केट यार्ड सहित ३ अन्य स्टोर भी हैं।

इस स्थान पर आम महोत्सव का आयोजन किया गया है। विपणन बोर्ड के माध्यम से। १ अप्रैल से ३१ मई २०२५ तक पीएमटी बस डिपो के पास गेट नंबर ९ मार्केट यार्ड, गांधी भवन मैदान-कोथरुड, मगरपट्टा- सीजंस मॉल के पास और ज़ेनसर कंपनी के पास खेल का मैदान खेल मैदान और



खराड़ी सहित चार स्थानों पर आम महोत्सव का आयोजन किया गया है। इस महोत्सव में रत्नागिरी, कोंकण के पांच जिलों सिंधुदुर्ग, रायगढ़, पालघर और ठाणे का भौगोलिक वर्गीकरण राज्य में इंडिकेशन-जीआई) प्रमाणित हापुस आम के साथ-साथ केशर, पायरी और अन्य आम की किस्में भी उपलब्ध हैं।

उपभोक्ताओं को जीआई और यूआईडी टैग वाले आम बेचे जा रहे हैं। इससे किसान उत्पादक बनते हैं अच्छी कीमत मिल रही है. महोत्सव में १५० उत्पादकों के लिए १२० स्टॉल उपलब्ध कराए गए हैं। इसमें एक हार्पून है, इसमें केसर, पैरी और बिटकी (छोटा) आम शामिल है।

महोत्सव में लगभग १७५ से ३०० ग्राम वजन के आम बेचे जा रहे हैं, जिनकी कीमत १५० रुपये से २५० रुपये के बीच है। ७०० एवं रु. इसका मूल्य १५०० प्रति दर्जन है। महोत्सव के पहले आठ दिनों में १०,००० दर्जन आम बेचे गए। करीब ९० लाख का कारोबार हुआ है।

Divas Ratri, 08/04/2025

# विपणन बोर्ड के आम महोत्सव में उमड़े उपभोक्ता... यूआईडी टैग से लाभ मिल रहा है।



**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड द्वारा आयोजित आम महोत्सव को अच्छी प्रतिक्रिया मिल रही है। ग्राहकों के लिए कोंकण से गुणवत्तायुक्त हापुस आम उपलब्ध हैं। हर साल, उत्पादक-से-उपभोक्ता प्रत्यक्ष बिक्री ३ योजना के अंतर्गत बाजार प्रांगण मेंआम महोत्सव का आयोजन किया जाता है। हालाँकि, पुणे के ग्राहकों के लिए पहली बार पुणे शहर में मार्केट यार्ड सहित ३ अन्य स्टोर भी हैं।

इस स्थान पर आम महोत्सव का आयोजन किया गया है। विपणन बोर्ड के माध्यम से। १ अप्रैल से ३१ मई २०२५ तक पीएमटी बस डिपो के पास गेट नंबर ९ मार्केट यार्ड, गांधी भवन मैदान-कोथरुड, मगरपट्टा- सीजंस मॉल के पास और ज़ेनसर कंपनी के पास खेल का मैदान खेल मैदान और खराड़ी सहित चार स्थानों पर आम महोत्सव का आयोजन किया गया है। इस महोत्सव में रत्नागिरी, कोंकण के पांच जिलों सिंधुदुर्ग, रायगढ़, पालघर और ठाणे का भौगोलिक वर्गीकरण राज्य में इंडिकेशन-जीआई) प्रमाणित हापुस आम के साथ-साथ केशर, पायरी और अन्य आम की किस्में भी उपलब्ध हैं।

उपभोक्ताओं को जीआई और यूआईडी टैग वाले आम बेचे जा रहे हैं। इससे किसान उत्पादक बनते हैं अच्छी कीमत मिल रही है. महोत्सव में १५० उत्पादकों के लिए १२० स्टॉल उपलब्ध कराए गए हैं। इसमें एक हार्पून है, इसमें केसर, पैरी और बिटकी (छोटा) आम शामिल है।

महोत्सव में लगभग १७५ से ३०० ग्राम वजन के आम बेचे जा रहे हैं, जिनकी कीमत १५० रुपये से २५० रुपये के बीच है। ७०० एवं रु. इसका मूल्य १५०० प्रति दर्जन है। महोत्सव के पहले आठ दिनों में १०,००० दर्जन आम बेचे गए।

करीब ९० लाख का कारोबार हुआ है।

# विपणन बोर्ड के आम महोत्सव में उमड़े उपभोक्ता, यूआईडी टैग से लाभ मिल रहा



**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड द्वारा आयोजित आम महोत्सव को अच्छी प्रतिक्रिया मिल रही है। ग्राहकों के लिए कोंकण से गुणवत्तायुक्त हापुस आम उपलब्ध हैं। हर साल, उत्पादक-से-उपभोक्ता प्रत्यक्ष बिक्री ३ योजना के अंतर्गत बाजार प्रांगण में आम महोत्सव का आयोजन किया जाता है। हालाँकि, पुणे के ग्राहकों के लिए पहली बार पुणे शहर में मार्केट यार्ड सहित ३ अन्य स्टोर भी हैं।

इस स्थान पर आम महोत्सव का आयोजन किया गया है। विपणन बोर्ड के माध्यम से। १ अप्रैल से ३१ मई २०२५ तक पीएमटी बस डिपो के पास गेट नंबर ९ मार्केट यार्ड, गांधी भवन मैदान-कोथरुड, मगरपट्टा- सीजंस मॉल के पास और ज़ेनसर कंपनी के पास खेल का मैदान खेल मैदान और खराड़ी सहित चार स्थानों पर आम महोत्सव का आयोजन किया गया है। इस महोत्सव में रत्नागिरी, कोंकण के पांच जिलों सिंधुदुर्ग, रायगढ़, पालघर और ठाणे का भौगोलिक वर्गीकरण राज्य में इंडिकेशन-जीआई) प्रमाणित हापुस आम के साथ-साथ केशर, पायरी और अन्य आम की किस्में भी उपलब्ध हैं।

उपभोक्ताओं को जीआई और यूआईडी टैग वाले आम बेचे जा रहे हैं। इससे किसान उत्पादक बनते हैं अच्छी कीमत मिल रही है. महोत्सव में १५० उत्पादकों के लिए १२० स्टॉल उपलब्ध कराए गए हैं। इसमें एक हार्पून है, इसमें केसर, पैरी और बिटकी (छोटा) आम शामिल है।

महोत्सव में लगभग १७५ से ३०० ग्राम वजन के आम बेचे जा रहे हैं, जिनकी कीमत १५० रुपये से २५० रुपये के बीच है। ७०० एवं रु. इसका मूल्य १५०० प्रति दर्जन है। महोत्सव के पहले आठ दिनों में १०,००० दर्जन आम बेचे गए। करीब ९० लाख का कारोबार हुआ है।

Agrowon, 02/04/2025

# कृषी पणन मंडळाचा आंबा महोत्सव सुरू

## महोत्सवात अस्सल हापूस, पायरी आणि केशर आंबा विक्रीस

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : ग्राहकांना अस्सल कोकणचा हापूस आंबा रास्त दरात उपलब्ध होण्यासाठी उत्पादक ते ग्राहक या संकल्पनेवरील राज्य कृषी पणन मंडळाच्या २३ व्या हापूस आंबा महोत्सवाला सोमवारपासून (१ एप्रिल) प्रारंभ झाला. हापूस आंब्याचा हंगाम बहरात आला असून, महोत्सवाच्या निमित्ताने कोकणातील शेतकऱ्यांनी आपला अस्सल आंबा विक्रीस आणला आहे. यंदा आंबा मुबलक असल्याने दर देखील रास्त असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

राज्य कृषी पणन मंडळासह पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यांतील तसेच राज्यातील केशर आंबा उपलब्ध झाला आहे. ग्रामीण विकास यंत्रणा विभागाकडील काही महिला बचत गटांचाही महोत्सवात सामावेश आहे. या बचत गटाकडून आंब्यासह अस्सल ग्रामीण पदार्थ देखील उपलब्ध आहेत. महोत्सवात सुमारे १२५ स्टॉल असून, मार्केट यार्ड येथील पीएमटी बस डेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत महोत्सव सुरू झाला आहे.

> **माझी २ हजार ५०० झाडे असून, या वर्षी हवामानाने साथ दिल्याने गेल्या वर्षीच्या तुलनेत २५ टक्के आंबा जास्त आहे. पहिल्या मोहोराला थ्रिप्सचा प्रादुर्भाव झाल्याने काही प्रमाणात कमी फळ लागली तर उन्हाळा जास्त असल्याने आंबा भाजत असून, डागी आंबा जास्त आहे. त्यामुळे पेटीतही आंबा भाजत असल्याने काही प्रमाणात आंबा खराब होण्याचे प्रमाण आहे. गेल्या वर्षी आंबा कमी असल्याने ४-५-६ डझनच्या पेटीचा दर ५ ते ६ हजार रुपये तेच दर या वर्षी ४ ते ४ हजार ५०० रुपये एवढे आहेत.**
>
> – **विपुल गोंणबरे,** परचुरी, ता. संगमेश्वर - (संपर्क - ९११९५६२४०५)
>
> – **सुभाष लांजेकर,** फुंणगूस, ता. संगमेश्वर (संपर्क - ९७६७६४९०६६)



**पुणे : राज्य कृषी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात मंगळवारी (ता.२) आंबा खरेदीसाठी आलेले कुटुंब**

### यंदा मुबलक हापूस

गेल्या वर्षी हवामान बदल, अवकाळी पाऊस आदी विविध कारणांनी आंब्याचे उत्पादन घटले होते. तर ऐन अक्षय तृतीयेला आंब्याची टंचाई निर्माण झाली होती. मात्र या वर्षी हवामानाने साथ दिल्याने आंबा मुबलक उपलब्ध असल्याने ग्राहकांनी जास्तीत जास्त आंबा खरेदी करण्याचे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक कदम यांनी केले आहे.

पुण्य नगरी

# पुण्यात चार ठिकाणी आजपासून आंबा महोत्सव

**पणन मंडळ आणि जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजन**

**पुणे** : कृषी पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने यंदाच्या आंबा महोत्सवास शहरात मंगळवारपासून (दि. १ एप्रिल) सुरुवात होत आहे. तसेच 'आंबा उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक' या उपक्रमातून शहरातील चार ठिकाणी आंबा विक्री केंद्र सुरू होत असून, ३१ मेपर्यंत आंबा विक्री सुरू राहणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने मार्केट यार्ड येथे ६० स्टॉल आहेत. याशिवाय गांधी भवन, कोथरूड येथे २० स्टॉल, मगरपट्टा-हडपसर येथे २० स्टॉल आणि खराडीत २० स्टॉल असे मिळून एकूण चार ठिकाणी १२० स्टॉल्सद्वारे आंबा विक्रीची व्यवस्था करण्यात आली आहे.

पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम म्हणाले की, आता जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळली जाणार आहे. ही बाब विचारात घेऊन पणन मंडळामार्फत आयोजित आंबा महोत्सवातदेखील जीआय मानांकन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने उत्पादक ते थेट ग्राहक संकल्पनेनुसार पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाचे सलग २४ वे वर्ष आहे. तरी ग्राहकांनी आंबाखरेदीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.

> आंबा महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यांतील भौगोलिक मानांकन तथा जीआय मानांकन मिळालेल्या हापूस आंब्यासह केशर व पायरी आंबे व इतर वाणांचा आंबा खरेदीची संधी पुणेकरांना मिळणार आहे.
>
> – **गजानन पाटील,** मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे म्हणाले की, आंबा महोत्सवात उमेद संस्थेअंतर्गत स्वयं सहाय्यता समूहातील महिलांनी तयार केलेल्या वस्तू व पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे पुणेकरांना ग्रामीण भागातील महिलांनी तयार केलेल्या चविष्ट पदार्थांची चव चाखता येणार आहे. तसेच, कृषी विकास अधिकारी अजित पिसाळ म्हणाले की, आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना रास्त बाजारभाव मिळावा या हेतूने महोत्सव सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

Pune Edition
Apr 01, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

Maharashtra Times, 01/04/2025

# आजपासून आंबा महोत्सवाला सुरुवात

## ३१ मेपर्यंत ग्राहकांना आंबा खरेदी करता येणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे



संग्रहित छायाचित्र

'राज्य कृषी पणन मंडळा'तर्फे आणि 'पुणे जिल्हा परिषदे'च्या सहकार्याने आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आज मंगळवारी या महोत्सवाचे उद्घाटन होणार असून ३१ मेपर्यंत ग्राहकांना आंबा खरेदी करता येणार आहे. मार्केट यार्ड, कोथरूड येथील गांधी भवन, मगरपट्टा-हडपसर आणि खराडी येथे हा महोत्सव होणार आहे. महोत्सवाचे हे २४ वे वर्ष आहे.

राज्यातील आंबा उत्पादकांना थेट विक्री करता यावी, यासाठी राज्याच्या विविध भागांत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्याबाबत पणनमंत्री जयकुमार रावल यांनी सूचना दिल्या होत्या. आंबा विक्रीव्यवस्थेतील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य मोबदला व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा, या उद्देशाने 'उत्पादक ते थेट ग्राहक' संकल्पनेनुसार या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यांतील भौगोलिक मानांकन मिळालेला हापूस आंबा; तसेच राज्यातील केशर, पायरीसह इतर वाणांचा आंबा उपलब्ध होणार आहे. कोकणातील हापूसच्या नावावर परराज्यातून आलेल्या आंब्याची विक्री केली जाते. जीआय मानांकनामुळे हापूसच्या नावे होणारी फसवणूक टाळता येणार आहे. याच दृष्टीने महोत्सवातही जीआय मानांकन मिळालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले.

या महोत्सवात मार्केट यार्ड येथे ६०, गांधी भवन, मगरपट्टा आणि खराडी येथे प्रत्येकी वीस दालने असतील. यामुळे शहराच्या विविध भागांतील ग्राहकांची सोय होणार आहे. कोकणातील उच्च प्रतीच्या हापूससह केशर आंब्याचा आस्वाद ग्राहकांना घेता येईल. नागरिकांनी महोत्सवात मनसोक्त खरेदी करावी, असे आवाहन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले.

# दर वाढल्याने आंबा खरेदीकडे ग्राहकांची पाठ

म. टा. प्रतिनिधी, पुणे

घाऊक बाजारात आवक कमी झाल्याने आणि आंब्याचे दर तेजीत असल्याने गुढीपाडव्याला शहरात आंब्याला मागणी कमी राहिली. ग्राहकांनी आंबा खरेदीकडे पाठ फिरवल्याची माहिती आंबा व्यापाऱ्यांनी दिली.

साडेतीन मुहूर्तांपैकी एक गुढीपाडव्याला आंब्यांना मागणी वाढते. यंदा प्रतिकूल वातावरणामुळे आंब्यांच्या लागवडीत घट झाली आहे. लागवड कमी झाल्याने गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा गुढीपाडव्याला आंब्यांची आवक कमी झाली. मागणीच्या तुलनेत आवक कमी होत असल्याने यंदा आंब्यांचे दर तेजीत आहेत. एक डझन हापूसचे दर ८०० ते १५०० रुपयांपर्यंत आहेत. गेल्या वर्षी गुढीपाडव्याला हापूसचा दर ५०० ते ७०० रुपयांपर्यंत होता. आंबा महाग झाल्याने गुढीपाडव्याला फारशी मागणी नव्हती. आंबा खरेदीकडे ग्राहकांनी पाठ फिरवली, अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील व्यापारी करण जाधव यांनी दिली.

मार्च महिन्यात आंब्याची आवक वाढते. आवक वाढल्यावर दर स्थिरावले, की ग्राहक खरेदीसाठी बाहेर पडतात. कोकणातून दररोज चार ते पाच हजार पेट्यांची आवक मार्केट यार्डातील फळबाजारात होते. सध्या बाजारात दररोज एक ते दोन हजार पेटी आंब्याची आवक होत आहे. नेहमीच्या तुलनेत बाजारात आंब्याची आवक कमी आहे. यंदाच्या हंगामात आंब्याचे दर तेजीत राहणार आहेत; तसेच हंगाम लवकर संपण्याची शक्यता आहे.

लोकमत

# क्विक Update



## पणन मंडळाचा आजपासून आंबा महोत्सव

**पुणे :** राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित आंबा महोत्सवास मंगळवार (दि.१) पासून सुरुवात होत आहे. आंबा उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक अंतर्गत शहरातील चार ठिकाणी आंबा विक्री केंद्रे सुरू असून, हा महोत्सव ३१ मेपर्यंत सुरू राहणार आहे, अशी माहिती पणन मंडळाने दिली. राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने १२ स्टॉलद्वारे विक्री केली जाणार आहे. यामध्ये मार्केट यार्ड (६० स्टॉल), गांधी भवन-कोथरूड (२० स्टॉल), मगरपट्टा-हडपसर (२० स्टॉल) आणि खराडीत (२० स्टॉल) विक्री केंद्र आहेत.

Hello Pune
Page No. 6 Apr 01, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

# अमेरिका, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिनावासी चाखणार हापूस आंब्याचा गोडवा

## चार हजार टनांचे निर्यातीचे उद्दिष्ट; गुजरात, कर्नाटक केरळलाही महाराष्ट्र पुरविणार निर्यात सुविधा

**नामदेव मोरे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** आंबा निर्यातीला चालना मिळावी यासाठी पणन मंडळाने नवी मुंबईमध्ये विकिरण सुविधा केंद्र सुरू केले आहे. या केंद्रातून यावर्षी ४ हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. ३ एप्रिलपासून अमेरिकेला निर्यात सुरू होणार असून ऑस्ट्रेलिया, जपानसह यावर्षीपासून अर्जेंटिनालाही आंबा निर्यात केला जाणार आहे. यावर्षीपासून पणन मंडळ हे गुजरात, कर्नाटक, केरळसह उत्तर प्रदेशमधील निर्यातदारांनाही सुविधा उपलब्ध करून देणार आहे.

भारतीय आंब्याला जगभरातून मागणी वाढत आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलियाला निर्यात करताना विकिरण प्रक्रिया व युरोपीयन देशांसह न्यूझीलंडसारख्या देशात आंबा निर्यात करताना व्हीएचटी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने यासाठी नवी मुंबईमध्ये अत्याधुनिक विकिरण प्रक्रिया केंद्र सुरू केले आहे. या केंद्रामध्ये जागतिक मानांकनाप्रमाणे आंब्यावर निर्जतुकीकरण प्रक्रिया केली जात आहे. या वर्षासाठी चार हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.



### ३ एप्रिलला कंटेनर जाणार

अमेरिकन निरीक्षक १ एप्रिलला दाखल होणार असून, आंब्याची डोज मॅपिंग सुरू करणार आहेत. त्यांनी हिरवा कंदील दाखविल्यानंतर ३ एप्रिलला पहिला कंटेनर पाठविला जाणार आहे. गतवर्षी मलेशियालाही आंबा निर्यात केला होता. यावर्षी मलेशियासोबत अर्जेंटिनाला आंबा निर्यात केला जाणार आहे.

### आंबा निर्यातीचा तपशील

| देश | निर्यात (टन) |
|---|---|
| जपान | ३५.११० |
| न्यूझीलंड | ९९.३३९ |
| दक्षिण कोरिया | ४.६९७ |
| युरोपियन देश | १२.२५२ |
| अमेरिका | १८३ |
| ऑस्ट्रेलिया | ४.०५७ |

### यंदा निर्यातदारांची संख्या जाणार १००वर

पणन मंडळाच्या विकिरण केंद्रातून गतवर्षी जवळपास ७५ निर्यातदारांनी आंबा निर्यात केला होता. यावर्षी ही संख्या १००च्या पुढे जाण्याची शक्यता आहे. यावर्षी मध्य प्रदेशमधील २, गुजरातमधील ४ व दक्षिणेकडील राज्यांतून ४ निर्यातदारांनी नोंदणी केली आहे. पणन मंडळ आता राज्यातील निर्यातदारांबरोबर देशातील चार राज्यांनाही आंबा निर्यातीची सुविधा उपलब्ध करून देणार आहे.

### व्हीएचपी प्रक्रिया करून आंबा निर्यात

१ आयएफसी-अमेरिका, ऑस्ट्रेलियाला आंबा निर्यात करताना आयएफसी तंत्राद्वारे तीन मिनिटांची व्हॉट वॉटर ट्रीटमेंट व रेडिएशन ट्रीटमेंट केली जाते.

२ **व्हीएचटी प्रक्रिया-युरोपियन व इतर काही देशांसाठी ही प्रक्रिया आवश्यक असते. यामध्ये एक तासाची व्हॉट वॉटर ट्रीटमेंट करून आंबा निर्यात केला जातो. काही देशांसाठी व्हीएचपी प्रक्रिया करून आंबा निर्यात केला जातो.**

### आंबा प्रकारानिहाय झालेली निर्यात

| प्रकार | निर्यात (टन) |
|---|---|
| हापूस | ७०.२५४ |
| केशर | १९२.८०३ |
| बेगनपल्ली | ४५.९६ |
| तोतापुरी | ०.८५७ |
| लंगडा | ७.७६२ |
| चौसा | ३.४९७ |
| मल्लिका | १.४८२ |
| नीलम | ०.३४६ |
| हिमायत | २.१५ |
| राजापुरी | ३.२४८ |
| दशेरी | ३.७०७ |
| रसालू | ०.२८७ |

### आजपासून डोजमॅपिंग सुरू

अमेरिकेचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे निरीक्षक भारतात दाखल झाले आहेत. पणन विभागाच्या नवी मुंबई केंद्रात येणार आहेत. याठिकाणी आजपासून ऑडीट व डोजमॅपींगची प्रक्रिया सुरू करणार आहे.